

# शिवराज्याभिषेक सोहळा



प्रा. श्री. अमोल सूर्यवंशी

Scanned with CamScanner

a

सादर करत आहे

# शिवछत्रपतींचा राज्याभिषेक

प्रा. श्री. अमोल शिवाजीराव सूर्यवंशी



Scanned with CamScanner

# शिवछत्रपतींचा राज्याभिषेक

लेखक – प्रा. श्री. अमोल शिवाजीराव सूर्यवंशी
प्राध्यापक - भारती विद्यापीठाचे जवाहरलाल नेहरू तंत्रनिकेतन,कात्रज, पुणे
Email: amolss. 01@gmail. com
Mob: 9850038077

या पुस्तकातील चित्रे प्रताधिकारमुक्त आहेत.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ (दंड व तुरुंगवास)शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



Scanned with CamScanner

a

**शिवछत्रपतींचा राज्याभिषेक**
**प्रकाशक – ई साहित्य प्रतिष्ठान**

www. esahity. com
esahity@gmail. com
9987737237 (Whatsapp for free ebooks)

प्रकाशन : ६ जून २०२३ (शिवराज्याभिषेक ३४९ वर्ष समारंभ)

©esahity Pratishthan®2023

**या पुस्तकात सुचविलेल्या सर्वच आरोग्यविषयक माहितीशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

# लेखक परिचय



**श्री. अमोल शिवाजीराव सूर्यवंशीं**

शिक्षण - ME Computer Engineer, [PhD Scholar]

जन्मतारीख- ६ जुलै १९८२.

मुळगाव - पलूस,ता. पलूस, जि. सांगली.

नोकरी- भारती विद्यापीठाचे जवाहरलाल नेहरू तंत्रनिकेत पुणे येथे गेल्या १५ वर्षांपासून संगणक विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत.

वाचन (विशेषतः इतिहास ) व दुर्ग भ्रमंतीची आवड. पुणे जिल्ह्यातील बहुतांश सर्व गडकिल्ल्यांची भ्रमंती पूर्ण.

निर्मिती प्रकाशन कोल्हापूर प्रकाशित सर्वव्यापी शिवराय या निबंध संग्रहात "छत्रपती शिवाजी महाराज-जीवन व कार्य " हा निबंध ऑगस्ट २०२२ मध्ये प्रकाशित.



Scanned with CamScanner

# मनोगत

नमस्कार. एक लेखक (खरेतर संकलक हा शब्दच जास्त चपखल) या नात्याने काही हितगुज करू इच्छितो आहे.

शिवछत्रपतींचा राज्याभिषेक या विषयावर लिहण्यासाठी ज्या संशोधक लेखकांचा संदर्भ घेतला अशा सर्वांना हे लिखाण समर्पित आहे. या सर्व इतिहास संशोधकांनी अथक परिश्रम करून शिवकालीन इतिहासाची मांडणी केली आहे. आदरणीय श्री. वा. सी. बेंद्रे, श्री. बाबासाहेब पुरंदरे, श्री. कृष्णराव अर्जुन केळुसकर, श्री. गो. नी. दांडेकर, डॉ. श्रीनिवास सामंत, श्री. विजय देशमुख, श्री. पु. ग. सहस्रबुद्धे, श्री. गोविंद पानसरे, डॉ. मिलिंद पराडकर, असे अनेक ज्ञात अज्ञात लेखक संशोधक या सर्वांच्या संशोधनाला, व्यासंगाला, इतिहासाप्रतीच्या प्रेमाला व या सर्वांनी घेतलेल्या अविरत परिश्रमांना मनापासून वंदन. खरेतर आज आपल्या समोर जो इतिहास आहे तोच मुळात या सर्व व्यक्तींमुळेच आहे. या सर्व संशोधकांनी जी इतिहासाची मांडणी केली आहे तीच मी फक्त एकत्रित करून एका धाग्यात गुंफण्याचा प्रयन्त केला आहे. मी जे काही संकलन केलें आहे त्या सर्वापाठीमागे याच सर्व संशोधकांचा व लेखकांच्या लिखाणाचा आधार, पुरावा व प्रभाव आहे. मी फक्त एक इतिहास अभ्यासक आहे. कोणतीही माहिती हि फक्त भावनेच्या आहारी न जाता मांडण्याचा प्रयन्त केला आहे. हे सर्व इथे नमूद करण्यापाठीमागचे कारण म्हणजे शिवचरित्र हा महाराष्ट्र मध्ये तरी अत्यंत भावनेचा विषय आहे, अभ्यासाचा तसा कमीच आहे.



Scanned with CamScanner

a

पंढरीचा विठूराया व छत्रपती शिवाजी महाराज ही महाराष्ट्राची दोन आराध्य दैवते. शिवाजी महाराजांचे नाव निघालं की मराठी माणसाला (जे महाराष्ट्रात राहतात ते सर्व मराठी, प्रदेशवाचक, जातीवाचक न्हवे) भरून येते. सहाजिकच शिवाजीराजांवर नि:पक्षपातीपणे, निरपेक्षपणे, अलिप्तपणे लिहिणे व बोलणे शंभर टक्के शक्य नाही. कितीही प्रयत्न केला तरी अशा लेखनात भक्ती, आदर, प्रेम हे भाव थोडेफार का होईना येतातच. हे सर्व दोष कमी करण्याचा प्रयत्न करून हे शिवआख्यान मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज ही व्यक्तिरेखा फार मोठी आहे, तिचे शेकडो पैलू आहेत. कुठल्याही अभिनिवेशाशिवाय शिवचरित्र मांडणे व समजावून घेणे हे एक फार मोठे कालातीत आव्हान आहे. त्यामध्येहि युगपुरुष, महापुरुष, शिवाचा अवतार अशा दैवी संज्ञा बाजूला ठेऊन फक्त एक आपल्या सर्वा सारखाच एक मनुष्य म्हणून महाराज समजून घेणे खूप आवश्यक आहे. आजच्या आपल्या हिंदू संस्कृतीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० वर्षांपूर्वीच्या राज्याभिषेकाचे महत्व अबाधित आहे. शिवछत्रपतींच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू साधार सर्वांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जे जे काही जुने परंपरावादी आहे त्यातील चुकीच्या गोष्टीमध्ये बदल करून ,त्या बंद करून, जे चांगले आहे त्यात भर घालूनच सर्वांची उन्नती आहे हे महाराजांनी आपल्याला ३५० वर्षांपूर्वीच सांगितले आहे. राज्याभिषेकाचे राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक पैलू एकत्रिक मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जे काही उणे राहिले



Scanned with CamScanner

असेल ती माझ्या अभ्यासाची व आकलनाची मर्यादा आहे. या छोटेखानी पुस्तकात स्वराज्याच्या फक्त पहिल्या राज्याभिषेकाची माहिती आहे.

ईसाहित्य सारख्या अत्यंत दर्जेदार व्यासपीठाची खरेतर आज खूप गरज आहे. वाचन व त्यापेक्षाही महत्वाच्या लेखन संस्कृतीला जे पाठबळ ईसाहित्यमुळे मिळाले आहे त्याला तोड नाही. ईसाहित्यच्या सर्व टीमला मनापासून शुभेच्छा. ईसाहित्याने मला संधी दिल्याबद्दल त्यांचा मी शतश: आभारी आहे.

संकलक, लेखक - प्रा. श्री. अमोल शिवाजीराव सूर्यवंशी.

प्राध्यापक - भारती विद्यापीठाचे जवाहरलाल नेहरू तंत्रनिकेतन,कात्रज, पुणे

Email: amolss. 01@gmail. com

Mob: 9850038077



Scanned with CamScanner

# अनुक्रम

1. प्रास्ताविक
2. राज्याभिषेकापूर्वीची महाराष्ट्रातील व हिंदुस्थानातील राजकीय स्थिती
3. हिंदू धर्म व राज्याभिषेक
4. राज्याभिषेकाची तयारी व राज्याभिषेक विधी तपशील
5. राज्याभिषेकाचे महत्व
6. अष्टप्रधान मंडळ
7. किल्ले रायगडची माहिती
8. राज्याभिषेक शक ( शिवशक )
9. राजव्यवहारकोश ( राजभाषाकोश )
10. समारोप
11. संदर्भ



Scanned with CamScanner

# शिवछत्रपतींचा राज्याभिषेक



Scanned with CamScanner

# प्रकरण १ ले – प्रास्ताविक

६ जून १६७४ ला सबंध हिंदुस्थानचा इतिहास बदलून टाकणारी घटना रायगडावर घडली, ती म्हणजे शिवछत्रपतींचा राज्याभिषेक. महाराजांनी राज्याभिषेक करण्यापाठीमागील कारणे पाहिली तर मन आश्चर्यमुग्ध होऊन जाते. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे एक अतिशय आशयपूर्ण, व्यवहारी, दूरदृष्टीचे कारण आहे. महाराजांनी राज्याभिषेक का केला? व तो काशीच्या गागाभट्टाकडूनच का केला? याच्याही पाठीमागे एक जबरदस्त कारण आहे. शिवछत्रपतींचा राज्याभिषेक व हिंदू धर्म याचा परस्पर संबंध उलघडून दाखवण्याचा हा प्रयत्न आहे. हिंदवी स्वराज्य' या महासंकल्पाचे जे स्फुरण महाराजांच्या चित्तांत झाले त्यानेच सतराव्या शतकापासून पुढचा भारताचा सर्व इतिहास पालटून गेला.

श्रीशिवराज्याभिषेकाचा प्रसंग हा मध्ययुगीन भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जावा एवढा महत्वाचा होता. या प्रसंगाने भारतीय जीवनात अनेक प्रकारे क्रांती घडवून आणली. शेकडो वर्षांपासून दास्यशृंखलांनी जखडलेल्या भारतीय जनतेला या प्रसंगामुळे विलक्षण प्रभावी चेतना प्राप्त झाली. सह्याद्रीच्या कुशीत मूळ धरलेल्या स्वराज्याच्या इवलाल्या रोपट्यानेच पुढे प्रचंड वृक्षाचा आकार धारण करून अखेरीस अवघा हिंदुस्थान यावनी गुलामगिरीतून विमुक्त केला. महाराजांच्यारूपाने एकप्रकारे शेकडो



Scanned with CamScanner

a

वर्षांपासून हरपलेली भारतीय अस्मिताच पुन्हा रायगडी सिंहासनावर विराजमान झाली ! या काळात हिंदुस्थानात हिंदूचे एकही सार्वभौम सिंहासन शिल्लक उरलेले नव्हते. उत्तरेकडील राजपूत राजे मोगलांचे खंडणी भरणारे मांडलिक बनलेले होते, तर दक्षिणेत विजयनगरचे साम्राज्य नष्ट होऊन कैक वर्षे उलटून गेली होती. त्या साम्राज्याच्या ठिकऱ्या उडाल्यानंतर अवशिष्ट राहिलेले संस्थानिकदेखील यावनी वरवंट्याखाली रगडले जाऊन रानोमाळ भटकत होते. या पार्श्वभूमीवर श्रीशिवराज्याभिषेकाचे महत्व कळायला वेळ लागणार नाही.

म्हणून आपण सुरवातीला हिंदू धर्माविषयी विवेचन करून नंतर राज्याभिषेकाकडे येउया.



Scanned with CamScanner

a

# प्रकरण २ रे

## राज्याभिषेकापुर्वीची

## हिंदुस्थानातील व महाराष्ट्रातील राजकीय स्थिती

पूर्वीच्या काळी हिंदूची अत्यंत विशाल अशी साम्राज्ये होती. चंद्रगुप्त, अशोक यांच्या साम्राज्यांत बलुचिस्तान, अफगाणिस्तान व त्यालगतचा प्रदेश यांचा अंतर्भाव झालेला होता. पुढे शक, यवन, युएची, हूण यांचा पराभव करून त्यांची आक्रमणे मोडून काढणारे पुष्यमित्र, पुलुमायी सातकर्णी, समुद्रगुप्त, श्रीहर्ष यांनीही हिंदुस्थानांत मोठमोठी साम्राज्ये स्थापन केली होती.

या काळांत हिंदूंच्या वैदिक धर्माच्या जोडीला बौद्ध व जैन हे धर्म भारतांत नांदत होते. त्या धर्माचे अनुयायी असलेले राजे आणि सम्राटही भारतांत अधिराज्य चालवीत होते. सम्राट अशोक, कलिंगराज खाखेल, श्री हर्ष महानंदपाल हे बौद्ध सम्राट होते. अमोघवर्ण हा जैन होता. चंद्रगुप्त मौर्य, सातवाहन राजे, मगधाचे चंद्रगुप्त, समुद्रगुप्त हे सम्राट, चालुक्य घराण्यातील पुलकेशी, विक्रमादित्य हे सर्व हिंदू असून वैदिक धर्मानुयायी होते. या सर्व राज्यकर्त्यांनी सहिष्णुता व सहजीवन हे धोरण अवलंबिले होते. [1]

१००१ साली गझनीच्या महंमदाने अटक ओलांडून हिंदुस्थानवर स्वारी केली. इतर सर्व धर्म,पंथ मोडीत काढून फक्त आपल्याच धर्माचा प्रसार करायचा हे जवळपास सर्वच मुस्लिम आक्रमकांचे धोरण होते. हजरत मुहम्मद पैगंबरांनी



Scanned with CamScanner

a

सहाव्या शतकात स्थापन केलेला मुस्लिम धर्म खरेतर सर्वसमावेशक व आचरण करायला खूप सोपा असल्याने प्रभावी होता. इतर सर्व धर्माप्रमाणेच इस्लामची उभारणी सुद्धा सत्य , अहिंसा,चारित्र्य,परस्पर प्रेम,सर्व धर्म समभाव अशाच तत्वांवर झाली. परंतु धर्म प्रसाराच्या वेळी बहुसंख्य रानटी टोळ्यांनी (तुर्क,मोंगल,तार्तार) हा धर्म स्वीकारला. अतिशय क्रूर व रानटी असलेले हे लोक मुसलमान झाले. त्यामुळे इस्लामची मूळ विचारधारा विकृत होत गेली. अल्लाची कृपा मिळवण्यासाठी धर्मप्रसार हेच साधन मानले गेले. त्यामुळे धर्मप्रसारासाठी इतर राज्ये जिंकणे व ते करताना लुटपाट व कत्तली करणे हेच भूषण होऊन बसले. हिंदुधर्म, हिंदुसंस्कृती, हिंदुपरंपरा व हिंदुजनता यांचा संपूर्ण नायनाट करण्याच्या प्रतिज्ञा करूनच इस्लामीयांनी भारतात पाऊल टाकले. गझनीच्या महमुदानेच या भीषण हत्याकांडाला प्रारंभ केला. नगरकोट, स्थानेश्र्वर, मथुरा, कनोज, सोमनाथ येथील देवालये त्याने लुटली, मूर्ती फोडल्या, त्यांची विटंबना केली. लाखो हिंदूंच्या कत्तली केल्या, लाखोंना बाटविले. हाच भयानक प्रलय पुढे सातआठशे वर्षे चालू होता. त्यांनी हिंदूवर जिझीया कर बसविला त्यांची मंदिरे, विद्यालये, धर्मग्रंथ व स्त्रिया यांची विटंबना केली. इस्लामच्या अभिमानाने लाखो हिंदूंच्या कत्तली केल्या आणि हिंदूंना हिंदू म्हणून जगणे अशक्य करून टाकण्याचे सर्व प्रयत्न केले. हिंदवी स्वराज्याची आवश्यकता निर्माण झाली ती त्यासाठी हिंदुधर्म, हिंदुसंस्कृती, परंपरा, भाषा, विद्या म्हणजे एकंदर अस्तित्वच टिकवावयाचे असेल तर इस्लामी साम्राज्य नष्ट करून भारतात हिंदवी स्वराज्य स्थापन झालेच पाहिजे, असे इतिहास आक्रंदन



Scanned with CamScanner

a

सांगू लागला. हिंदू, जैन, बौद्ध यांची राज्ये झाली पण दोघापैकी एकालाच जगता येईल, दुसऱ्याचा नाशचं झाला पाहिजे अशी वृत्ती भारतात केव्हांच निर्माण झाली नव्हती. मुसलमानांच्या आक्रमणानंतर मात्र हि परिस्थिती निर्माण झाली. [1]

मोहम्मद गझनीने केलेल्या सुरवातीनंतरच्या साडेसहाशे वर्षात हि परिस्तिथी बदलावी असे फक्त एकाच व्यक्तीच्या चित्तात आले. शिवछत्रपतींच्या पूर्वी इस्लामी आक्रमणाला तोंड देऊन त्याला पायबंद घालण्याचे, आणि हिंदूंचे स्वतंत्र राज्य स्थापण्याचे दोन फार मोठे प्रयत्न झाले. आणि ते अंशतः सफलही झाले. राजस्थान आणि विजयनगर. सोळाव्या शतकांत इस्लामच्या आक्रमणापुढे या दोन्ही सत्ता नामोहरम झाल्या आणि १५६५ साली विजयनगर व १५६८ साली चितोड पडल्यावर भारतात पुन्हां असा काळ आला की, या महापराक्रमी लोकांचे कार्य जणू झालेच नाही.

अगदी वरवर पाहिले तरी मुसलमानी आक्रमणाचा हा इतिहास मुसलमानांच्या पराक्रमाचा नसून हिंदूंच्या नादानीचा, कमालीच्या नादानीचा आहे असे स्पष्ट दिसू लागते. इसवी सनाच्या पहिल्या सहस्रकांत परक्यांची आठदहा प्रचंड आक्रमणे आपल्या बाहुबलाने सहज लीलया मोडून काढून त्या परक्या हिंस्र जमातींना आपल्या अंतरांत पचवून, आत्मसात् करून टाकणारे जे त्यावेळचे शौर्य-धैर्यसंपन्न हिंदुलोक त्यांचेच हे पुढच्या काळातले हिंदु वंशज आहेत का, असा प्रश्न मनापुढे उभा राहतो. त्यांचे ते अतुल रणपांडित्य, ती मुत्सद्देगिरी, ती सावधता, ती स्वधर्मनिष्ठा, ते संघटनाकौशल्य हे कोठे गेले आणि



Scanned with CamScanner

का गेले, या प्रश्नांनी मन कासावीस होते. विचार करता करता बुद्धी कुंठित होते. एक एवढा समर्थ समाज एकाएकी इतका पराक्रमहीन, विकल, दुर्बल आणि नादान होईल यावर विश्वास बसत नाही. पण इतिहासांत तसे प्रत्यक्ष घटलेलेच आहे. तेव्हा त्याचा विचार करणे प्राप्त आहे. [1]

भारतीय उपखंडात म्हणजेच तत्कालीन हिंदुस्तानात मुस्लिम आक्रमकांनी येऊन मुस्लिम राजसत्ता स्थापन केल्या. मुस्लिम राज्यकर्ते राज्य स्थापनेसाठी किंवा बळकवण्यासाठी युद्धे करीत, खून-राजकारण करीत. तुर्क, अफगाण, मोंगल, इराणी, हबशी, अरबी, हिंदी असे अनेक वंशांचे लोक इस्लामीयांत होते. आणि त्यांच्यांत आपसांत नित्य घनघोर रणकंदने होऊन त्यांच्यातच भयानक कत्तलीही होत असत. परंतु अशा कोणच्याही वेळी या आलेल्या संधीचा फायदा हिंदूंनी घेतला नाही. गुलामवंश, घोरीवंश, खिलजी, मोगल, लोदी, सूरवंश यांच्या दिल्लीच्या स्वामित्वासाठी सारख्या लढाया चालू होत्या. दिल्लीची सत्ता स्थिर, दृढ, दुर्भेद अशी एवढ्या दीर्घ काळांत फारच थोडा वेळ होती. कोणीही यावे आणि पहिल्या सुलतानाला हुसकून आपण राज्य बळकवावे अशी स्थिती अकबराच्या आधी नित्याची झाली होती. पण दिल्लीसाठी भांडणारे हे लोक कोणी सय्यद होते, लोदी होते, घोरी, खिलजी, तुर्क,, मोंगल होते. हिंदू कधीही नव्हते. स्थानेश्र्वरच्या लढाईत एकदा ११९२ साली पराभूत झाल्यानंतर हिंदूनी हस्तिनापूरच्या या सिंहासनासाठी प्रयत्न केलाच नाही. दिल्लीची सत्ता दीर्घकाळ डळमळत्या स्थितीत होती. ती राज्यलक्ष्मी यांना सहज वश झाली असती, पण हिंदू स्थितप्रज्ञच राहिले.



Scanned with CamScanner

a

तिच्याकडे डोळा उचलून पहाण्याचे पापसुद्धा त्यांनी केले नाही. मग मुसलमानांनी तेथे राज्य न करावे तर काय करावे! हिंदूंना इहलोकीचे ऐश्र्वर्यभोग नकोच होते. [1]

महाराष्ट्रातीलही राजकीय परिस्थिती काही वेगळी न्हवती. महाराष्ट्रातील वैभवाच्या शिखरावर असलेली देवगिरीची यादव राजवट दिल्लीच्या अल्लाउद्दीन खलजीने फेब्रुवारी १२९४ मध्ये लुटली व बुडविली. प्रचंड लुटलेली संपत्ती घेऊन व रामदेवराय यादव राजा कडून खंडणी वसूल करून तो परतला. १३०७ मध्ये यादवांचा युवराज शंकरदेवाने दिल्लीची खंडणी बंद केली. यामुळे अल्लाउद्दीन खलजीने पुन्हा मलिक काफूर या सरदाराला महाराष्ट्रा वर म्हणजेच देवगिरीवर स्वारीसाठी पाठवले. देवगिरीचा पुन्हा पराभव करून मलिक काफूरने महाराष्ट्रात फौज ठेऊन पून्हा दिल्लीला प्रयाण केले. यानंतर रामदेवराजाच्या जावयाने हरपालदेवाने १३१८ मध्ये पुन्हा बंड केले. परंतु सुलतान मुबारिकखान खलजीने ते मोडून काढले व सुलतानांची कायमस्वरूपी महाराष्ट्रावर सत्ता सुरु झाली. अचूक नेतृत्वाचा व सावधपणाचा अभाव यामुळे महाराष्ट्रावर हे अरिष्ट आले. यानंतर महाराष्ट्रावर १३२६ मध्ये तुघलक सुलतानांचे राज्य आले. हे सर्व सुलतान दिल्लीतून राज्यकारभार करीत. हसन गंगू बहामनी या महाराष्ट्रातील सरदाराने तुघलकांविरुद्ध बंड करून महाराष्ट्र १३४७ मध्ये ताब्यात घेतला व गुलबर्गा येथे राजधानी केली. या बहामनी बादशाहीचे पाच सरदार जे पाच सुभ्याचें सुभेदार होते त्यांनी स्वतःची राजवट सुरु केली. ते म्हणजे एलिचपूरचा इमादशाह,अहमदनगरचा



Scanned with CamScanner

निजामशाह,गोवळकोंड्याचा कुतुबशाह, विजापूरचा आदिलशाह व बिदरचा बेरीदशाह. या सर्व सुलतानांच्या आक्रमक राज्यविस्ताराच्या व लुटीच्या धोरणामुळे तत्कालीन दक्खन म्हणजे महाराष्ट्रात नेहमी लढाया सुरु असत. या सर्व सुलतानांनी एकत्र येऊन राक्षसतागडी येथे जानेवारी १५६५ मध्ये दक्षिण भारतातील विजयनगरचे शेवटचे एकमेव हिंदू राज्य संपविले. महाराजांच्या जन्माअगोदर सुमारे ३५० वर्षे महाराष्ट्रावर सुलतानांची सत्ता होती. [2][5]

परंतु या शेकडो वर्षात हिंदूंना आपले स्वतःचे राज्य स्थापावे हि कल्पना का नाही सुचली? सुचली असेल असेल तर ती प्रत्यक्षात आमलात आणण्याचे धाडस का न्हवते? हिंदूंची जी काही मोठी राज्ये होती, विजयनगर असो व यादव साम्राज्य असो, एका मोठ्या लढाईनंतरच्या अपयशाने संपूर्ण जमीनदोस्त झाली. हि राज्ये पुन्हा का उभी राहू शकली नाहीत? अगदी किरकोळ परकी आक्रमकांनासुद्धा हिंदूंना उलथून टाकता आले नाही. एवढी घोर अवकळा या समाजाला आली तरी कशाने? इतके निर्वीर्य, निःसत्व हे लोक झाले कशाने? आणि शिवछत्रपतींनी असे काय केले की ज्यामुळे एकाएकी मन्वंतर होऊन मोगली सत्तेचे निर्मूलन करण्यास मराठे समर्थ झाले?

या सर्वांचे मूळ कारण हिंदू धर्मातील काही चुकीच्या संकल्पनांमध्ये होते. सर्वसामावेशक, अतिशय उत्कट, हजारो वर्षांची परंपरा असलेल्या हिंदू धर्माबद्दल हि टीका नसून फक्त काही चुकीच्या संकल्पनांमुळे सर्व समाजाचे कसे नुकसान होते हे दाखवण्याचा हा प्रामाणिक प्रयन्त आहे. (कृपया कोणीही धार्मिक भावना दुखावून घेऊ नयेत)



Scanned with CamScanner

# प्रकरण ३ रे

# हिंदू धर्म व राज्याभिषेक

हिंदू धर्म हा जगातील सर्वात प्राचीन धर्मांपैकी एक आहे, त्याची मुळे हजारो वर्षांपूर्वीची आहेत. ही एक जटिल आणि वैविध्यपूर्ण, धार्मिक आणि तात्विक परंपरा आहे जी भारतीय उपखंडात निपजली व सुदृढही झाली. हिंदू धर्माचा इतिहास अनेक कालखंडांमध्ये विभागला गेला आहे व, अनेक महत्त्वपूर्ण घडामोडीनी परीपूर्ण आहे.

1. सिंधू संस्कृती (2600-1900 BCE): सिंधू संस्कृती, ज्याला हडप्पा संस्कृती म्हणूनही ओळखले जाते, ही जगातील सर्वात प्राचीन नागरी संस्कृतींपैकी एक मानली जाते. सिंधू खोऱ्यातील पुरातत्व उत्खननात आरंभीच्या काही हिंदू धार्मिक प्रथांशी संबंधित असलेल्या चिन्हांसह विविध कलाकृती उघडकीस आल्या आहेत.

2. वैदिक कालखंड (1500-500 BCE): वैदिक कालखंडाला हिंदू धर्मातील सर्वात जुने पवित्र ग्रंथ वेदांचे नाव देण्यात आले आहे. संस्कृतमध्ये रचलेल्या या ग्रंथांमध्ये स्तोत्रे, विधी आणि तात्विक प्रतिबिंब आहेत. वेदांमध्ये इंद्र, अग्नि, वरुण आणि रुद्र अशा विविध देवतांच्या पूजेवर जोर देण्यात आला आहे. या काळात धार्मिक प्रथांमध्ये विधी यज्ञ यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.



Scanned with CamScanner

a

3. उपनिषदिक आणि ब्राह्मणी कालखंड (800-200 BCE): वैदिक कालखंडाच्या शेवटी उदयास आलेले उपनिषद, तात्विक ग्रंथ, आधिभौतिक प्रश्न आणि वास्तवाचे स्वरूप शोधतात. ते ब्रह्म (अंतिम वास्तव) आणि आत्मा (वैयक्तिक आत्मा) यांसारख्या संकल्पनांचा परिचय देतात. या काळात वेदांत आणि सांख्य यांसारख्या तात्विक शाळांचा उदय झाला, ज्यांनी हिंदू विचारांना आकार दिला.

4. महाकाव्य आणि पुराण काल (400 BCE - 500 CE): हा काळ महाभारत आणि रामायण या दोन महान संस्कृत महाकाव्यांच्या रचनेद्वारे चिन्हांकित आहे. या महाकाव्यांमध्ये कथा, दंतकथा आणि नैतिक शिकवण आहेत. त्यांनी धर्म (कर्तव्य/धार्मिकता) ही संकल्पनाही मांडली आणि विष्णू आणि शिव यांसारख्या देवतांच्या भक्तीवर जोर दिला. पुराण, ग्रंथांची एक शैली, देखील या काळात लिहिली गेली आणि तपशीलवार पौराणिक खाते, देव आणि ऋषींच्या वंशावळी आणि धार्मिक विधींचे वर्णन दिले गेले.

5. शास्त्रीय कालखंड (500-1500 CE): शास्त्रीय कालखंडात न्याय, वैशेषिक, योग, मीमांसा आणि वेदांत यासह प्रमुख हिंदू तात्विक प्रणालींचा विकास झाला. आदि शंकराचार्य, रामानुज आणि मध्वाचार्य यांसारख्या प्रख्यात तत्त्वज्ञ आणि विद्वानांनी हिंदू विचारांच्या व्याख्या आणि पद्धतशीरीकरणात योगदान दिले. मंदिरे धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यांची प्रमुख केंद्रे बनली.

आदि शंकराचार्य, ज्यांना शंकर किंवा आदि शंकरा म्हणूनही ओळखले जाते, ते 8 व्या शतकात राहणारे एक प्रभावशाली तत्ववेत्ता, धर्मशास्त्रज्ञ आणि



Scanned with CamScanner

a

संत होते. त्यांनी हिंदू धर्माला आकार देण्यात आणि पुनरुज्जीवन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, विशेषत: अद्वैत वेदांत तत्त्वज्ञान विद्यालयाद्वारे. हिंदू धर्मातील शंकराचार्यांच्या भूमिकेचे काही प्रमुख पैलू येथे आहेत:

1. अद्वैत वेदांत: शंकराचार्य हे प्रामुख्याने अद्वैत वेदांत या अद्वैतवादी तत्त्वज्ञानाच्या निर्मिती आणि प्रसारासाठी ओळखले जातात. अद्वैत वेदांतानुसार, परम वास्तव (ब्रह्म) निराकार, शाश्वत आणि भेदांच्या पलीकडे आहे. शंकराचार्यांनी यावर जोर दिला की वैयक्तिक आत्मा (आत्मा) ब्रह्माशी मूलत: एकरूप आहे आणि या अद्वैतवादी स्वभावाच्या अनुभूतीतूनच खरी मुक्ती (मोक्ष) मिळू शकते.

2. भाष्ये आणि मजकूर व्याख्या: शंकराचार्यांनी उपनिषद, भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्रांसह प्राचीन हिंदू धर्मग्रंथांवर भाष्ये लिहिली. त्यांच्या भाष्यांनी ग्रंथांमध्ये गहन अंतर्दृष्टी प्रदान केली आणि एक पद्धतशीर आणि सुसंगत तात्विक चौकट म्हणून अद्वैत वेदांत स्थापित केला. विद्वान आणि अध्यात्मिक ज्ञानाच्या साधकांकडून या कार्यांचा उच्च आदर आणि अभ्यास केला जात आहे.

3. मठांची स्थापना आणि शंकराची परंपरा: शंकराचार्यांनी भारतातील विविध क्षेत्रांमध्ये चार प्रमुख मठांची स्थापना केली, ज्यांनी शिक्षण आणि आध्यात्मिक मार्गदर्शनाची केंद्रे म्हणून काम केले. हे मठ शृंगेरी, द्वारका, पुरी आणि बद्रीनाथ शहरात आहेत. प्रत्येक मठाचे नेतृत्व शंकराचार्य करतात, जे अद्वैत वेदांत परंपरेचे आध्यात्मिक नेते आणि संरक्षक म्हणून काम करतात.



Scanned with CamScanner

a

4. हिंदू धर्माचे एकत्रीकरण: त्यांच्या हयातीत, शंकराचार्यांनी भारतीय उपखंडात मोठ्या प्रमाणावर प्रवास केला, विविध तात्त्विक शाळा आणि धार्मिक परंपरांच्या विद्वानांशी वादविवाद आणि चर्चा करण्यात गुंतले. त्यांनी अद्वैत वेदांताचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा आणि हिंदू धर्मातील विविध विरोधाभासी समजुती आणि प्रथांमध्ये समेट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांनी विविध हिंदू पंथ आणि परंपरांना एकत्र आणण्यात आणि एकत्रित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

5. वैदिक विधींचे पुनरुज्जीवन: ज्ञान मार्गावर जोर देताना, शंकराचार्यांनी आध्यात्मिक वाढ आणि अभिव्यक्तीचे साधन म्हणून कर्मकांडाचे महत्त्व देखील ओळखले. त्यांनी वैदिक विधींचे पुनरुज्जीवन केले आणि त्यांच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले, मन शुद्ध करण्यासाठी आणि उच्च ज्ञानासाठी काही पद्धती तयार करून त्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

6. त्याग आणि संन्यासाचे प्रवर्तक: शंकराचार्यांनी आध्यात्मिक मुक्ती मिळविण्याचे साधन म्हणून त्याग (संन्यास) मार्गाचा पुरस्कार केला. त्यांनी दशनामी संन्यास परंपरेची स्थापना केली, ज्यात संन्यासाच्या दहा आदेशांचा समावेश आहे. सांसारिक आसक्तींपासून अलिप्तता आणि अध्यात्मिक अनुभूतीच्या समर्पित प्रयत्नांवर जोर देऊन ही परंपरा अनेक साधू आणि साधक पाळत आहेत.

एकंदरीत शंकराचार्यांनी हिंदू धर्म आणि तत्वज्ञानात दिलेले योगदान मोठे आहे. त्यांनी वेदांतिक शिकवणांचे पुनरुज्जीवन केले, पवित्र ग्रंथांचे सखोल



Scanned with CamScanner

a

विवेचन केले, विविध हिंदू परंपरांमध्ये एकता वाढवली आणि ज्ञान आणि त्याग या मार्गावर जोर दिला. त्यांचा वारसा साधकांना आध्यात्मिक ज्ञानाच्या मार्गावर प्रेरणा आणि मार्गदर्शन करत आहे.

भगवद्गीता, ज्याला अनेकदा गीता म्हणून संबोधले जाते, हा एक पवित्र हिंदू धर्मग्रंथ आहे जो प्राचीन भारतीय महाकाव्य, महाभारताचा एक भाग आहे. हा राजकुमार अर्जुन आणि भगवान कृष्ण यांच्यातील एक तात्विक आणि आध्यात्मिक संवाद आहे, जो त्याचा सारथी आणि दैवी मार्गदर्शक म्हणून काम करतो. गीता रणांगणावर अर्जुनाला भेडसावलेल्या अस्तित्त्वाच्या प्रश्नाचे आणि नैतिक दुविधांचे निराकरण करते, शिकवणी आणि अंतर्दृष्टी सादर करते ज्यांचे व्यापक नैतिक परिणाम आहेत. भगवद्गीतेतील काही प्रमुख नैतिक धड्यांमध्ये हे समाविष्ट आहे:

हिंदू धर्मात, कलियुगाची संकल्पना हिंदू विश्वविज्ञानात वर्णन केल्याप्रमाणे वर्तमान युग किंवा काळाच्या चक्रात संदर्भित करते. हिंदू धर्मग्रंथांनुसार, काळ चक्रीय आहे आणि चार प्रमुख युगांमध्ये विभागलेला आहे, ज्यांना युग म्हणतात, जे एका विशिष्ट क्रमाने एकमेकांचे अनुसरण करतात: सत्ययुग, त्रेतायुग, द्वापर युग आणि कलियुग. कलियुग हा चक्राचा अंतिम आणि गडद काळ मानला जातो. कलियुगाच्या संकल्पनेतील काही प्रमुख पैलू येथे आहेत:



Scanned with CamScanner

a

1. कालावधी: प्रत्येक युगाचा विशिष्ट कालावधी असतो. पारंपारिक गणनेनुसार, कलियुगाचा कालावधी 432,000 वर्षांचा आहे, ज्याची सुरुवात हिंदू धर्मग्रंथांमध्ये नमूद केलेल्या विशिष्ट खगोलीय घटनांनी केली आहे.

2. नैतिकतेची घसरण: कलियुगात नैतिक मूल्ये, धार्मिकता आणि अध्यात्मिक जागरूकता यांची घसरण होते. असे मानले जाते की मानव अधिकाधिक भौतिक इच्छा, अहंकार आणि स्वार्थाने प्रेरित होतो. हा कालावधी अज्ञान, भ्रम आणि नैतिक अधःपतनाच्या व्याप्तीशी संबंधित आहे.

3. सामाजिक व्यवस्थेचे विघटन: कलियुगात, सामाजिक संरचना आणि संस्था बिघडत असल्याचे मानले जाते. पारंपारिक रूढी, अखंडता आणि सामाजिक सौहार्दाला तडा जात आहे. लोभ, भ्रष्टाचार आणि अप्रामाणिकता अधिक प्रचलित होते, ज्यामुळे व्यापक सामाजिक अशांतता निर्माण होते.

4. अध्यात्मिक आव्हाने: कलियुग हा अध्यात्मिक साधना आणि प्राप्तीसाठी आव्हानात्मक काळ मानला जातो. असे मानले जाते की अध्यात्मिक ज्ञान आणि प्रथा कमी होत आहेत आणि आध्यात्मिक साधनेमध्ये रस नसतो. तथापि, असेही मानले जाते की प्रामाणिक आध्यात्मिक साधक या युगातही आध्यात्मिक मुक्ती मिळविण्याचे साधन शोधू शकतात.

5. कल्किचा अवतार: हिंदू धर्मग्रंथ कलियुगाच्या अखेरीस भगवान विष्णूचा अंतिम अवतार असलेल्या कल्किच्या आगमनाची भविष्यवाणी करतात. असे मानले जाते की कल्की पांढऱ्या घोड्यावर, तलवार चालवत, आणि धार्मिकता पुनर्संचयित करते, अंधाराच्या युगाचा अंत करते.



Scanned with CamScanner

a

काही हिंदू याला अधोगती आणि अध:पतनाचे शाब्दिक युग म्हणून पाहतात, तर काही लोक याला काळाचे चक्रीय स्वरूप आणि एखाद्याच्या आध्यात्मिक प्रवासात येणाऱ्या आव्हानांचे प्रतीक म्हणून पाहतात.

गीता हा हिंदुधर्माचा महाग्रंथ. सर्व हिंदूंवर भगवदगीतेचे किती वर्चस्व आहे हे भारतीयांना सांगावयास नको. गीतेचा अर्थ श्रीशंकराचार्यांच्या (हिंदू धर्मपीठाचे तत्कालीन प्रमुख) पूर्वीच्या काळी भाष्यकारांनी महाभारतकारांप्रमाणे ज्ञानकर्मसमुच्चयात्मक म्हणजे ज्ञानाबरोबरच ज्ञानी मनुष्याने स्वधर्मोक्त कर्म केले पाहिजे असा प्रवृत्तिपर लावला होता. आठव्या शतकापासून श्रीशंकराचार्यांपासून मात्र प्रकरण उलटले आणि तेथून पुढे श्री. रामानुजाचार्य (इ. स. १०१६), निंबार्क (११६२), श्री. मध्वाचार्य (११९८), श्री. वल्लभाचार्य (१४७९) या आचार्यांनी, एकजात सर्वांनी, गीतेचा अर्थ केवळ निवृत्तिपर, आणि संन्यासपर लावला. त्यांनी केवळ गीतेचाच नव्हे तर उपनिषदे, ब्रह्मसूत्रें यांचाही अर्थ तसाच लावला आणि त्याच धर्माचा उपदेश करून हिंदूंना धन, वैभव, समृद्धी, स्वराज्य, भौज्य, वैराज्य, साम्राज्य यांची, इतकेंच नव्हे तर वैयक्तिक संसारांतील स्त्री -पुत्रादिकांच्या उत्कर्षाची सुद्धा, अणुमात्र इच्छा राहू नये असा अट्टाहास चालविला. शतकानुशतक समाजाला निवृत्तीचे, संन्यासधर्माचे, संसारनिंदेचे असे अखंड पाठ मिळत राहिल्यामुळे, स्वराज्य, साम्राज्य, समाजसंघटना, व्यापार, विद्येची, विज्ञानाची उपासना, जगप्रवास, याविषयींची भारतीयांच्या मनांतली उभारीच नष्ट झाली [1]. अशा स्थितींत परकी आक्रमणाला ते बळी पडत राहिले तर नवल काय? एकेकाळी



Scanned with CamScanner

a

महापराक्रमी असलेला एखादा समाज दुसऱ्या काळी इतका नादान होईल, इतका अधोगामी, पौरुषहीन, कर्तृत्वशून्य, स्वत्वशून्य होईल याच्यावर विश्वास ठेवणे सुद्धा कठीण जाते. पण प्रत्यक्ष हे घडलेले आहे. याच भूमींत घडले आहे. आणि आपलेच इतिहासकार ते वृत्त सांगत आहेत. तेव्हा त्याबद्दल नुसते खेदोद्गार काढण्यांत काहीच अर्थ नाही. अर्थ आहे तो त्याची मीमांसा करण्यांत, असे कां घडले हे पहाण्यांत, या दुर्दैवाची कारणमीमांसा करण्यांत, त्यांतून भविष्यकाळासाठी काही ऐतिहासिक सत्ये शोधून काढण्यांत [1].

भारतीयांनी या काळात कलियुगाचे तत्त्वज्ञान स्वीकारले होते. सत्ययुगात उन्नति होत जाते आणि कलियुगात अधःपातच व्हावयाचा, अशी श्रद्धा त्यावेळी समाजमनात घर करून राहिली होती आणि त्यावेळचे धर्मप्रवक्ते ती दृढमूल करून टाकीत होते. त्यामुळे मुसलमानी आक्रमणाला तोंड द्यावे, ते मोडून काढावे ही उभारी जनमनांतून नाहिशी होत चालली होती. कारण आता म्लेंच्छाचाच म्हणजे मुस्लिमांचाच जय व्हावयाचा, त्यांचेच राज्य चालायचे, कलियुगामुळे आपल्या प्रयत्नाला यश येणार नाही हीच हीन भावना लोकांच्या मनात रुतून बसली होती. राजकारण, देशांतले राष्ट्रीय व्यवहार यांविषयी कमालीचे औदासीन्य हा त्या काळच्या हिंदुसमाजांतला अत्यंत घातक असा दोष होय. निवृत्तीधर्माने तो प्रथम निर्माण झाला, कलियुग-कल्पनेने तो पोसला गेला आणि कडक जातिबंधनामुळे-रोटीबंदी, बेटीबंदीमुळे सर्व समाजात रोगबीजासारखा पसरला. इस्लामी धर्म आक्रमण, साम्राज्य,स्वधर्माचा प्रसार, विश्र्वसंचार, जगनेतृत्व, शत्रूंचा संहारयांची प्रेरणा देत होता. तर हिंदुधर्म या



Scanned with CamScanner

a

काळांत मायावाद, निवृत्ती, मोक्ष,संसाराचे क्षणभंगुरत्व यांचा उपदेश करून मनुष्याच्या मनांतल्या या आकांक्षा समूळ नष्ट करण्याचा कसून प्रयत्न करीत होता[1]. आपण दिल्लीचे सत्ताधीश व्हावे असे कधीही कोणत्याच हिंदू राज्यकर्त्याला वाटू नये याला हीच वरील सर्व कारणे लागू पडतात. खरेतर धर्माची व्याख्या या पुढील वचनात आपल्याच पूर्वजांनी किती समर्पक सांगितली आहे.

'धारणाद्धर्म इत्याहुः धर्मो धारयते प्रजाः।'

नागरिकांच्या मनांत थोर आकांक्षा, विजीगीषा जागृत करून त्यांना स्फूर्ती देणे, प्रेरणा देणे हे धर्माचे कार्य या वचनांतली धर्म शब्दाचा अर्थ येथे अभिप्रेत आहे. समाजाचे धारण-पोषण करणे, त्याच्या योगक्षेमाची चिंता वहाणे, त्याला सामर्थ्य, समृद्धी, वैभव प्राप्त करून देणे, त्याला आत्मरक्षणाला व पराक्रमाला समर्थ करणे, हे धर्माचे कार्य आहे. [1]

उलट पराक्रम, महत्त्वाकांक्षा, विजिगीषा यांची हत्या करतील अशीच तत्त्वे या धर्माने उराशी कवटाळली होती. मुसलमानांनी जो पराक्रम केला, आक्रमणे केली, राज्ये स्थापिली, येथे विध्वंस केला, कत्तली केल्या,हिंदूंना जुलमाने बाटविले, त्यांची मंदिरे लुटली, जाळली, विद्यापीठे धुळीला मिळविली, येथे जे जे केले त्याचा मागे त्यांच्या धर्माची प्रेरणा होती. असली शक्ती निर्माण करण्याचा हिंदुधर्माने प्रयत्न केला नव्हता. इतकेच नव्हे तर वैभव, समृद्धी, पराक्रम यासाठी अवश्य असणाऱ्या सर्व प्रेरणांची अगदी टिपण घेऊन



Scanned with CamScanner

a

हत्या करण्याचा विक्रम मात्र अनेक शतकें हिंदूंनी चालिवला होता. हिंदूंच्या वर सांगितलेल्या लांछनास्पद अपयशाची सर्व कारणे या धर्माच्या लावलेल्या चुकीच्या अर्थामध्ये आहेत. नेमके शिवाजीमहाराजांनी हेच बदलले. महाराजांच्या कारकिर्दीत कधी न्हवे ते हिंदू आक्रमक दिसतात. आणि अनादी काळापासून एकच तत्व चालले आहे ते म्हणजे तुम्ही आक्रमक असलात तरच तुमचा बचाव होतो. छत्रपतींच्या भोवती उदयास आलेल्या कर्त्या माणसांची नुसती नावे पाहिली तर महाराजांच्या सामाजिक व धार्मिकक्रान्तीमुळे नव्या सामाजिक थरांतून,आजपर्यंत ओसाड पडलेल्या जमिनीतून, नवीन कर्तृत्व कसे उदयास येते हे सहज कळून येईल. जेधे, मालुसरे, पालकर, कंक, नरसाळा, पानसंबळ, डबीर, कोरडे, हणमंते, गुजर, मोहिते, पिंगळे, रांझेकर, लोहोकरे, काकडे, नाईक, चिटणीस, प्रभु, भंडारी, लाय पाटील अशी कर्त्या पुरुषांची घराणींच्या घराणी आपल्याला त्याकाळी राजकारणोन्मुख झालेली दिसतात. हेलोक पूर्वी वतनासाठी भांडत बसले होते, शेती करून गुजारा करीत होते, पातशाही नोकरी करत होते. ते राष्ट्रीय प्रपंचाविषयी सर्वस्वी उदासीन होते. छत्रपतींनी त्यांना धर्माचा नवा अर्थ सांगितला. [1][9]



Scanned with CamScanner

a

# प्रकरण ४ थे

## राज्याभिषेकाची तयारी व राज्याभिषेक विधी तपशील

महाराजांना राज्याभिषेक होणे ही अशी काळाची गरज असली तरी, राज्याभिषेकाची प्रेरणा मुळात कोणाची हा प्रश्न अभ्यासकांसाठी नेहमीच विवाद्य स्वरुपाचा ठरलेला आहे. अशी प्रेरणा गागाभट्टांनी दिली की जिजाऊसाहेबांनी दिली, बाळाजी आवजी चिटणीसांनी दिली की समर्थ रामदास स्वामींनी दिली की महाराजांनीच स्वतः असा निर्णय घेतला हे सांगणारा निर्णायक स्वरूपाचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तशी मुळात सर्वांचीच इच्छा होती असे म्हणता येईल. [7] परंतु ज्या पद्धतीने रायगडची उभारणी करण्यात आलेली आहे त्यावरून असा तर्क काढला तर तो चुकीचा होनार नाही कि राज्याभिषेकाची कल्पना शिवाजी महाराजांचीच व त्यासाठीची तयारी स्वतः महाराज कितीतरी वर्षे करीत होते.

महाराजांचे एक शिष्टमंडळ राज्याभिषेकाच्या माहितीसाठी राजस्थानमध्ये गेले. कारण तिकडील बरेच क्षत्रिय राजे स्वतःला राजे म्हणून अभिषेक करवून घेत असत. बाळाजी आवजी चिटणीस, केशवभट्ट, भालचंद्रभट्ट, सोमनाथभट्ट कात्रे इत्यादी मंडळीनी राजस्थान मधील चितोड, उदेपूर या राजधान्यांमध्ये राज्याभिषेकाच्या पूर्वतयारी विषयी चौकशी करून हि



Scanned with CamScanner

a

सर्व मंडळी महाक्षेत्र वाराणशी येथे पोहचली. वाराणसीत हि मंडळी गागा भट्टना भेटली. [6][10]

गागाभट्टाना या मंडळींनी रायगडला निमंत्रित केल्याप्रमाणे महाराजांची व गागाभट्टांची भेट होऊन राज्याभिषेकासंबंधी चर्चा झाली. राज्याभिषेक करायचा ठरल्यानंतर गागाभट्टानी "राजाभिषेक प्रयोग:" व "तुलापुरुषदान विधी" या ग्रंथाचे लेखन फक्त आणि फक्त शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी केले. [2],[7],[8]

राज्याभिषेक समारंभातील प्रत्येक विधी अत्यंत्य अभ्यासपूर्वक, धर्मशास्त्रीय चिकिस्तेने गागाभट्टानी ठरविलेला होता. राज्याभिषेक सोहळा पूर्ण एक सप्ताह चालला. २९ मे १६७४ रोजी सुरवात होऊन ६ जून १६७४ ला समारंभाची सांगता झाली. गागा भट्टांच्या मार्गदर्शनाखाली भोसले घराण्याचे उपाध्याय बाळंभट्टानी राज्याभिषेक विधीचे सूत्रसंचालन केले. राज्याभिषेक विधी वैदिक पद्धतीने करण्यात आला.

शुक्रवार दि. २९ मे १६७४ रोजी सकाळी राजश्रीची मुंज झाली. उपनयन-संस्कारामुळे महाराज आता 'द्विज' झाले होते. सभासद बखरकार लिहितात की "उत्तरेस क्षत्रियाचे व्रतबंध होतात त्याप्रमाणे व्रतबंध करावा हा विचार आधी करून भट गोसावी यानी राजियाचा क्षेत्री व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रिय आधी केला. " मौजीबंधनानंतर त्याच दिवशी दुपारी तुलादान व तुलापुरुषदान विधी करून महाराजांनी उशीरा मुंज झाल्याबद्दल व आजवर कळत-नकळत घडलेल्या हत्याबद्दल प्रायश्चित्त घेतले. यावेळी सुवर्ण रौप्य, ताम्रादी धातू तसेच



Scanned with CamScanner

सप्त धान्ये या सर्वांनी महाराजांची तुला करण्यात येऊन ते सर्व द्रव्यपदार्थ[a] ऋत्विजांना दान करण्यात आले. (दानविधी मात्र राज्याभिषेकानंतर करण्यात आला. ) [7]

शनिवार ३० मे १६७४ रोजी महाराजाचा सोयराबाई साहेबांशी समंत्रक विवाह लावण्यात आला. लग्नविधी वैदिक पद्धतीने पुन्हा झाल्याने शाखानुसार महाराजांना सपत्नीक राज्याभिषेक करण्याची मोकळीक मिळाली. [2][7][8]

रविवार, दि. ३१ मे १६७४ रोजी ब्रह्मवृंदांच्या वेदमंत्रघोषात ऐन्द्रिशांतीचे कार्य सुरू झाले. प्रथम कुंडात अग्नि प्रतिष्ठा, नंतर इंद्राणीचे पूजन, चतुष्कुंभपूजन व त्यात बलिदान होऊन ऐन्द्रिशांतीविधी आटोपला. [2][7][8]

सोमवार, दि. १ जून १६७४ रोजी ग्रह यज्ञ, नक्षत्रहोम, दानधर्म व शेवटी ब्राह्मण भोजन हे कार्यक्रम पार पडले. [2][7][8]

मंगळवार, दि. २ जून १६७४ हा दिवस भाकड दिवस म्हणून सोडून दिला. कारण मंगळवार व नवमी हे दोन्ही योग राज्याभिषेकसंबंधीत विधांसाठी निषिद्ध होते. [2][7][8]

बुधवार, दि. ३ जून १६७४ रोजी नक्षत्र यज्ञ होऊन उत्तर पूजनानंतर आचार्यांना 'प्रतिमादान' केले गेले. [2][7][8]

गुरुवार, दि. ४ जून १६७४ रोजी रात्री निर्ऋतियाग झाला. या भागात इतर यागद्रव्यांसोबतच पक्व व अपक्व मांस, मत्स्य व सुरा यांचेही बलिदान झाले. [2][7][8]



Scanned with CamScanner

शुक्रवार, दि. ५ जून १६७४ या दिवशी सकाळी प्रथम ऐन्द्रिशांतीचे कार्य आटोपले आणि त्यानंतर मुख्य राज्याभिषेकविधीला सुरुवात झाली. हा विधी शुक्रवारी सायंकाळपासून तो शनिवारी पहाटेपर्यंत चालला. सिंहासनारोहणाचा मुहूर्त शनिवारच्या पहाटेचा होता. शुक्रवारी सायंकाळी प्रथम गणेशपूजन, स्वस्तिवाचन, मातृकापूजन व वसोद्धारपूजन होऊन नादिश्राद्ध, नारायणपूजन व आज्य होम झाला. आज्याहुति दिल्यानंतर राज्याभिषेकास आरंभ झाला. [2][7][8]

महाराज सोयराबाईसाहेबांसह येताच प्रथम मंडपपूजन झाले. महावेदी भोवती प्रत्येक दिशेस चार चार कुंभ स्थापन केले गेले. पूर्वेस सुवर्ण कुंभ, दक्षिणेस रजत कुंभ, पश्चिमेस ताम्र कुंभ व उत्तरेस मृत्तिका कुंभ ठेवले जाऊन त्यातील एकेकात घृत, दुग्ध, दधी व जल भरले. पूर्वेकडील उरलेल्या तीन कुंभांमध्ये मधु भरला. अन्य दिशांकडील सर्व कुंभांमध्ये जल भरले गेले. हे सर्व कुंभ पल्लव पुष्पांनी सुशोभित केलेले असून त्यांच्या गळयास बस्त्रवेष्टन करून ठेवलेले होते. या कुंभांच्या बाजूलाच ठिकठिकाणांहून आणलेल्या पुण्य सरितांचे व सागरांचे पवित्र जल असलेले कुंभ तसेच रत्न, गंध, पुष्प, फल इत्यादी औषधपूर्ण जलांचे कुंभ ठेवलेले होते. जवळच औदुंबरवृक्षाची आसंदी स्थापन केलेली होती. विधीस प्रारंभ झाल्यानंतर महावेदीवर अग्नीची व ग्रहांची प्रतिष्ठापना केली गेली. सर्व कुंभही प्रतिष्ठापित केले गेले. त्यानंतर सर्वप्रधान होम करण्यात आला. यावेळी सर्व वेदांच्या तसेच सर्व शाखांच्या ब्राह्मणांनी वेदमंत्रांचा घोष केला. जापकांनी जप व द्वारपाळांनी एकच जयघोष करून



Scanned with CamScanner

a

वातावरण भारून टाकले. गागाभट्टांनी सर्वांच्या उभे राहण्याच्या जागा पूर्वीच नेमून दिलेल्या होत्या. कोणी कोणते मंत्र म्हणायचे हेही ठरलेले होते. सर्व विधी मोठ्या गंभीरपणे, पवित्र वातावरणात सुरू होते. पूर्णाहुतीनंतर महाराजांना अभिषेक शालेमध्ये नेण्यात आले. सुगंधी तैले व चूर्णे यांनी तसेच उष्णोदकांनी महाराजांना समंत्रक स्नान घातले गेले. शुक्ल वस्त्र व गंधमाला लेऊन महाराज पुन्हा पीठावर आले. तेथे निरनिराळ्या मुद्रा मंत्रघोषात त्यांना लावल्या गेल्या. त्यानंतर पंचामृत स्नान घातले गेले. पुन्हा शुभ्र वस्त्र व गंधानुलेपन करून महाराज वेदमंत्रांच्या मंगल घोषात मंडपात आले. गागाभट्टांच्या मार्गदर्शनानुसार मग महाराजांनी वेदीवर प्रतिष्ठित केलेल्या औदुंबराच्या आसंदीवर गुडघे टेकून तळपाय लागू न देता विधीपूर्वक आरोहण केले. महाराज औदुंबर-आसंदीवर प्रविष्ट होताच लगबगीने सर्व आचार्य व सांवत्सर पुरोहित मंगल कलश घेऊन त्यांच्याजवळ आले आणि त्यांनी मंत्रघोषात महाराजांना अभिषेक करण्यास सुरुवात केली. अभिषेकसमाप्ती होताच महाराज आसंदीखाली उतरले. त्यांनी अग्निनारायणाची प्रार्थना करून आशीर्वाद याचना केली. महाराज आता 'प्रति इंद्र' झाले होते। यानंतर सर्व ब्राह्मणांसह महाराज अभिषेक शाळेतील सुवर्ण सिंहासनाकडे गेले. पवित्र वेदमंत्रांनी वातावरण भारलेले असतानाच 'प्रति इंद्र' झालेल्या महाराजांनी त्या सुवर्णसिंहासनावर आरोहण केले. आचार्यांनी शास्त्रविधीनुसार महाराजांना आता सिंहासनाधीश्वर केले होते ! आता पाळी होती महाराजांच्या अष्ट प्रधानांची व प्रजाजनांची. आठ दिशांना आठ प्रधान



Scanned with CamScanner

a

कलश घेऊन उभे होते. तसेच काही सर्वसामान्य नागरिकांनाही हा बहुमान दिलेला. या सर्वांनी महाराजांवरती अभिषेक केला. [7]

शनिवार ६ जुन १६७४ रोजी पहाटेच्या सुमाराला तुडुंब भरलेल्या राजसभेत महाराजांनी प्रवेश केला. पहाटे ५ च्या सुमाराला नियोजित शुभ मुहूर्तावर सिहांसनास पद स्पर्श न करता उजवा गुडघा त्यावर टेकून उगवतीच्या दिशेकडे पाहत महाराजांनी सिहासनावर आरोहण केले. "क्षत्रीयकुलावतंस सिहांसनाधीश्वर श्रीराजा छत्रपती शिवाजी महाराज" या नव्या बिरुदावलीचा सर्वांनी उद्घोष केला. जवळपास ७ दिवसांच्या विविध होम, तुलादान, दुर्गशांती अशा विधीनंतर महाराज ६ जुन १६७४ रोजी सिहासनाधिष्टीत झाले. [2][7][8]

दानविधी व निरोप समारंभ ७ जूनला सुरु झाला व १२ दिवस चालला. राज्याभिषेक प्रसंगी कोणत्याही याचकाला महाराजांनी विन्मुख पाठवले नाही. या भव्य कार्यक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी आणि आनंदी वातावरणात सहभागी होण्यासाठी राज्याच्या विविध भागातून लोक जमले. या सोहळयाच्या स्मरणार्थ मेजवानी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास वीस हजार लोक या प्रसंगी उपस्थित होते व एकूण सर्व समारंभास पन्नास लक्ष रुपयांपेक्षा जास्त खर्च आला. [7]

परंतु या वेळी एका अतिशय महत्वाच्या व्यक्तीची आठवण आल्याशिवाय राहत नाही. ती व्यक्ती म्हणजे शहाजीराजे भोसले. एक स्वतंत्र व सार्वभौम सत्ताधीश होण्याची बीजे शहाजीराजांनीच जिजाबाईसाहेबांच्या



Scanned with CamScanner

मदतीने शिवाजीराजांमध्ये रुजवली व वाढवली. स्वतंत्र्य राज्य स्थापनेचा त्यांनी तीन वेळा प्रयत्न केला होता.






Scanned with CamScanner

a

# प्रकरण ५ वे

## राज्याभिषेकाचे महत्व

राज्याभिषेक करण्याची कारणे- १. वर्णाश्रम हिंदू धर्मपद्धतीमुळे महाराजांना व संपादन केलेल्या राज्याला धर्माची मान्यता मिळाली व श्रेष्ठत्त्व प्राप्त झाले. स्वराज्यातील प्रजेला सार्वभौमत्वाचा प्रयत्य येण्यासाठी राज्याभिषेक खूप महत्वाचा होता. [2]

२. अभिषिक्त राजा असल्यामुळे आपोआपच महाराजांना धार्मिक बाबतीत सुद्धा न्यायदानाचे अधिकार मिळाले. यापूर्वी ब्राम्हण गुन्हेगारांच्या शासनाबाबतचे अधिकार बाबत परावलंबित्व होते. विविध कालबाह्य रूढींचा दंडक राजकारणाच्या आड येत होता, तो बंद झाला.

३. कलियुग संकल्पनेनुसार हिंदू धर्मामध्ये कोणीही राजा किंवा सम्राट होणार नाही असा एक जनमानसात गैरसमज होता. तो मोडून निघाला.

४. सह्याद्रि लगतच्या अनेक घाटातुन देश आणि कोकण यामध्ये चालत असलेल्या व्यापाराला सुरक्षा मिळाली. सर्व प्रशासन राजधानी रायगड वरून केंद्रीय पद्धतीने सुरु झाल्यामुळे भ्रष्टचाराला बराच आळा बसला, व एकसूत्रता आली. राज्याभिषेकाला वाणी, महाजन, शेटे या व्यापाऱ्यांची उपस्थितीही याचीच साक्ष देतात [2].



Scanned with CamScanner

a

५. या समारंभात सर्व वर्णाच्या लोकांना पंचामृताचा व पवित्र तीर्थांचा अभिषेक करण्यास मुभा देण्यात आली होती[8]. तत्कालीन सारा समाज समपातळीवर आणण्यासाठी तसेच सर्व वर्णातील सर्व समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी महाराजांनी स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला.

६. आपण उभे केलेले राज्य आपल्यानंतरही टिकले पाहिजे,लढले पाहिजे त्यासाठी आपल्या लोकांना कशाची प्रेरणा राहील तर ती विधीवत स्थापित सिहांसनाची हे राजांनी अचूक हेरले होते म्हणून त्यांनी स्वतःला राज्याभिषेक करून घेतला.

७. गागाभट्टांच्या मते शिवरायांनी स्वतः निर्माण केलेल्या राज्याला व संपत्तीला नंतर वारसाबाबतच्या समस्या निर्माण होण्याचा धोका होता. तो टाळण्यासाठी राज्याभिषेकाची गरज होती[8].

८. स्वतःच्या राज्याची नवी नाणी सुरु केली. आर्थिकदृष्ट्या व व्यापारीदृष्ट्या आपण सक्षम आहोत हेच नवीन नाण्यामधून सिद्ध केले. [2][7].

९. आत्मघातकी किंकर्तव्यमूढ करणाऱ्या प्रारब्धवादाला शेवटचा धक्का देण्यासाठी स्वतंत्र, सार्वभौम हिंदवी सिंहासनाची प्रतिष्ठापना करणे अवश्यंभावी कार्य झाले होते. [1]

१०. राजसिंहासनाची प्रतिष्ठापना म्हणजे अस्तित्वात असूनही अस्तित्वात नसलेल्या हिंदवी स्वराज्यास राजकीय, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक, धार्मिक स्वरूपाचा श्रेष्ठ दर्जा व स्थायी स्वरूपाचे प्रशासकीय स्थैर्य प्राप्त करून देणाऱ्या



Scanned with CamScanner

साधनाची निर्मिती होती. एकसंघ, सुदृढ, घटनात्मक स्थैर्य लाभलेले, वैचारिक क्रांती घडवून आणणारे, सुस्पष्ट ध्येय धोरण असलेले हिंदवी स्वराज्य निर्माण होण्यामुळेच भावी कार्याची दिशा सुस्पष्ट होणार होती ,देशाचा कायापालट होण्याचा मार्ग सापडू शकणार होता. [1]

महाराजांनी राज्याभिषेक का केला ते पहिले परंतु काशीच्या गागाभट्टाकडूनच का केला? महाराष्ट्रातसुद्धा पैठणला धर्मपीठ होतेच की?

गागाभट्ट श्रीकाशी क्षेत्रातील अग्रपूजेचे मानकरी होते. खरे नाव होते श्री. विश्वेश्वरभट्ट बिन दिवाकरभट्ट परंतु त्यांना त्यांचे वडील प्रेमाने गागा असे संबोधत. त्यामुळे पुढे गागाभट्ट हेच नाव प्रचलित झाले. मूळचे पैठणचे. वेदविद्येची सेवा व प्रसार करण्यासाठी भट्ट घराण्याने पिढ्यान पिढ्या खर्च केल्या. गागाभट्टांच्या आजोबांचे आजोबा रामेश्वरभट्ट ज्ञानार्जन करण्यासाठी खूप फिरले. हे विजयनगरचे विख्यात सम्राट कृष्णदेवराय यांच्या दरबारातही काही काळ होते. पुढे ते काशीक्षेत्री कायमचे जाऊन राहिले. काशीच्या विश्वेश्वराचे मंदीर सुलतानांनी उद्धवस्त केलेले. गागाभट्टांचे पणजोबा नारायणभट्ट यांनी पुन्हा या मंदिराची स्थापना केली होती. भट्ट घराण्याने ' मीमांसा व धर्मशास्त्र' या विषयात विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली. [2]

शुद्राचार शिरोमणी या ग्रंथाचे आणि विशेषतः त्यातील “कलावांद्यन्त्यो:स्थिती:I” या एकांगी कल्पनेचे ज्यांनी आग्रहपूर्वक खंडन केले ते म्हणजे गागाभट्ट [6]. या कल्पनेनुसार कलियुगामध्ये फक्त दोनच वर्ण शिल्लक आहेत ब्राम्हण व शूद्र. म्हणजे क्षत्रिय पृथ्वीवरून नामशेष झालेत हा



Scanned with CamScanner

a

मतप्रवाह. अकबर बादशहाच्या कारकिर्दीत कृष्ण नरसिंह शेष या पंडिताने काशी येथे शुद्राचार शिरोमणी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी सिद्धांत मांडला कि कलियुगात क्षत्रीय उरले नाहीत. परशुरामाने सर्व पृथ्वी नि:क्षत्रीय केली असल्याने हिंदू धर्मात चातुर्वर्णापैकी ब्राम्हण व शूद्र हे दोनच वर्ण शिल्लक आहेत. थोडक्यात राज्यभिषेकाचा अधिकार फक्त क्षत्रियांचा, परंतु हिंदू धर्मात आता क्षत्रिय शिल्लकच नाहीत मग शिवरायांचा राज्याभिषेक कसा करणार? हा काहीजणांचा आक्षेप होता. गागाभट्टानी "कायस्थधर्मप्रदीप" या त्यांच्या ग्रंथामध्ये क्षत्रियत्वाच्या संकल्पना नव्याने सांगितल्या व शुद्राचार शिरोमणी या ग्रंथातील संकल्पना खोडून काढल्या. [10] श्रीकाशी क्षेत्रातील अग्रपूजेचे अधिकारी, धर्मशास्त्रात पारंगत व धर्मशास्त्रावर विपुल ग्रंथलेखन केलेले गागाभट्टच “राज्याभिषेकप्रयोग” हा ग्रंथ स्वतः लिहून राज्याभिषेक करणार म्हंटल्यावर राज्याभिषेकाच्या बाबतीत धर्माच्या नावाखाली, आडून खोटे मतप्रवाह व गैरसमज पसरविणारांचा आवाजच पूर्ण बंद झाला.

ब्राह्मण, मराठे हे जन्मतःच श्रेष्ठ या कल्पना छत्रपतींनी हेटाळून टाकल्या. जो लढेल तो क्षत्रिय, जो ज्ञानार्जन केल्यामुळे विद्वान असेल तो ब्राम्हण ही कल्पना त्यांनी आदरिली. त्यामुळेच मागे सांगितल्याप्रमाणे सर्व जातीजमातींतून कर्तृत्व फुलारून वर आले. महाराजांनी कलियुग कल्पना नष्ट केली, आपले देवच मुस्लीमांना वश आहेत हा घातकी समज जनमनांतून समूळ काढून टाकला. त्याचप्रमाणे धर्मातील चुकीच्या कल्पना बदलून पद्धितांची म्हणजे बळजबरीने बाटल्या गेलेल्या धर्मांतर झालेल्या लोकांची शुद्धि, परदेशप्रवास,



Scanned with CamScanner

a

समुद्रप्रवास हे नवे धर्मांचार सुरू केले. बजाजी निंबाळकर, नेताजी पालकर या बाटलेल्या हिंदूंना पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश देण्याबाबत छत्रपती शिवाजी महाराजांचा विशाल दृष्टिकोन दिसून येतो. कारण परंपरेनुसार हिंदू धर्मातून फक्त बाहेर जायला परवानगी होती,पुन्हा धर्मात येण्यास न्हवती. आरमार बांधून स्वतः बेदनूरवर समुद्रमार्गे स्वारी करून शकताशतकांची सिंधुबंदी रद्द केली. म्हणजेच शिवरायांनी राज्यक्रांतीबरोबरच धर्मक्रांतीही केली[1]. मल्हारराव रामराव चिटणीस यांनी शिवाजी महाराजांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र लिहिले आहे. त्यांत कलियुग कल्पना छत्रपतींनी कशी हेटाळून टाकिली त्याचे वर्णन केले आहे.

इस्लामच्या धर्म सिद्धांतनुसार मोंगल शासन हे सर्वस्वी लष्करी स्वरूपाचे होते. परंतु मध्ययुगात शिवाजी महाराजांनी शासन हे सनदी व मुलकी स्वरूपाचे बनविले. एक जबाबदार विकेंद्रित मंत्रिमंडळ बनविने हे मोंगलाना कधीच जमले नाही. दीर्घकाळ सत्तेवरती असणाऱ्या मुघल शासकांना राष्ट्र घडविता आले नाही. परंतु शिवाजी महाराजांनी अतिशय कमी वेळेमध्ये एक चांगला प्रयत्न केला व त्यामध्ये त्यांना एका ठराविक मर्यादेपर्यंत अतिशय चांगले यश ही मिळाले. सम्राट अकबर पासून मोंगलाना मिळालेल्या प्रत्येक विजयामुळे अखंड हिंदुस्तानात मोंगलाचा कोणीच पराभव करू शकत नाही अशी समजूत झालेली. हि समजूत सर्व प्रथम महाराजांनी मोडीत काढली. मध्ययुगीन कालखंडात एकमेव राजकीय सत्ता होती की जी धर्म वेडात उभारली गेली नसून सामाजिक व राष्ट्रीय भावनेच्या पायावर उभारली गेली आहे ती म्हणजे शिवाजी महाराजांनी स्थापन केलेली सत्ता. इतिहासामध्ये शेकडो



Scanned with CamScanner

वर्षांपासून इतकी रचनात्मक प्रतिभा कोणत्याही हिंदू राज्यकर्त्याने दाखवलेली नाही. हिंदूसुद्धा राज्य स्थापन करू शकतात, राष्ट्र घडवू शकतात, आपले संरक्षण स्वतः करून शत्रूचा पराभव करू शकतात, कला व साहित्य निर्मिती करू शकतात, व्यापार व उद्योगधंदे याची भरभराट करू शकतात, स्वतःचे आरमार (नौदल) निर्माण करून नौयुद्धात परकीयांच्या आरमाराचा पराभव सुद्धा करू शकतात हे शिवाजी महाराजांनी आपल्या स्वतःच्या उदाहरणावरून सिद्ध करून दाखवले व हिंदूंनी आपला विकास आपण स्वतःच आपल्याच शक्तीने व युक्तीने करून घ्यावा हि शिकवणसुद्धा दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना होती. यात शिवाजी महाराजांची सार्वभौम शासक म्हणून औपचारिक स्थापना झाली आणि न्याय, प्रशासन आणि लष्करी पराक्रमाच्या तत्त्वांवर आधारित स्वतंत्र मराठा राज्याची त्यांची दृष्टी प्रदर्शित झाली.



Scanned with CamScanner

a

# प्रकरण ६ वे

## अष्टप्रधान मंडळ

राज्यकारभारासाठी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक करून राज्याला एक स्थिर व मुलकी प्रशासन दिले. अशा प्रकारचे मुलकी म्हणजेच सनदी प्रशासन ही त्यावेळची एक अभिनव व उपयुक्त कल्पना महाराजांनी प्रत्यक्षात आणली. सुल्तानांचे सरदार हेच लष्करी तसेच सनदी अधिकारी म्हणून काम पाहत. त्यामध्ये फक्त लढाईवरच जास्त भर असे,प्रशासनाकडे बिलकुल दुर्लक्ष असे.

अष्टप्रधान मंडळ, ज्याला आठ मंत्र्यांची परिषद म्हणूनही ओळखले जाते, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत मराठा साम्राज्याच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या मंत्र्यांची नियुक्ती शिवाजी महाराजांनी त्यांना राज्यकारभारात आणि निर्णय घेण्यात मदत करण्यासाठी केली होती. प्रत्येक मंत्र्याकडे विशिष्ट जबाबदाऱ्या होत्या आणि त्यांनी साम्राज्याच्या कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावली. येथे अष्टप्रधान मंडळ आणि त्यांच्या सदस्यांच्या भूमिकांचा थोडक्यात आढावा आहे:

1. पेशवा: पेशवा हा सर्वोच्च दर्जाचा मंत्री होता आणि पंतप्रधानपद भूषवत होता. तो राज्यकारभार, लष्करी व्यवहार आणि राजनैतिक संबंधांसह साम्राज्याच्या संपूर्ण प्रशासनासाठी जबाबदार होता. पेशव्यांनी राजाचे मुख्य सल्लागार म्हणून काम केले आणि दैनंदिन प्रशासनात महत्त्वपूर्ण भूमिका



Scanned with CamScanner

a

बजावली. मोरोपंत पिंगळे हे पहिले पेशवा होते . मोरोपंत पेशवे यांचा जन्म 1620 मध्ये महाराष्ट्रातील मालेगाव या गावात झाला. पेशवे म्हणून, मोरोपंतनी मराठा साम्राज्याची प्रशासकीय चौकट स्थापन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. राज्यकारभार, महसूल प्रशासन आणि लष्करी संघटनेशी संबंधित विविध धोरणे तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम त्यांनी केले. मोरोपंत पेशवे केवळ कुशल प्रशासकच नव्हते तर ते कवी आणि विद्वानही होते. त्यांनी मराठीत अनेक कविता आणि अभंग (भक्तीगीते) रचले, जे महाराष्ट्रातील लोकप्रिय देवता भगवान विठ्ठलावरील त्यांची भक्ती प्रतिबिंबित करतात. मोरोपंत पेशवे यांचे 1683 मध्ये निधन झाले.

2. अमात्य: अमात्य, ज्यांना मुझुमदार म्हणूनही ओळखले जाते, त्यांनी अर्थमंत्री म्हणून काम केले. महसूल संकलन, कर आकारणी आणि आर्थिक नियोजन यासह साम्राज्याचे वित्त व्यवस्थापित करणे ही त्याची प्राथमिक जबाबदारी होती. राज्याची आर्थिक स्थिरता राखण्यात अमात्यांचा मोलाचा वाटा होता. रामचंद्रपंत हे पहिले अमात्य होते. यांचा जन्म 1650 मध्ये महाराष्ट्राच्या कोकण भागात झाला. रामचंद्र पंत अमात्य यांचा लहानपणापासूनच शिवाजी महाराजांशी जवळचा संबंध होता. रामचंद्र पंत अमात्य यांच्याकडे अमात्यांचे महत्त्वपूर्ण पद होते, ज्याचा अर्थ अर्थमंत्री किंवा कोषाध्यक्ष असा होतो. अमात्य या नात्याने, त्यांनी मराठा साम्राज्याचे आर्थिक व्यवस्थापन केले, ज्यात महसूल संकलन, कर आकारणी आणि आर्थिक नियोजन यांचा समावेश होता.



Scanned with CamScanner

a

रामचंद्र पंत अमात्य यांनी हुकुमत पन्हा ही प्रणाली सुरू केली, जी महसूल संकलनात एकसमानता आणि कार्यक्षमता आणण्याच्या उद्देशाने जमीन महसूल प्रणाली होती. या व्यवस्थेने मराठा साम्राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. शिवछत्रपतींच्या स्वराज्यानितीवर रामचंद्रपंत अमात्यानी आज्ञापत्र हा ग्रंथ लिहिला. 1716 मध्ये रामचंद्र पंत अमात्य यांचे निधन झाले.

3. सचिव: छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाचे पहिले सचिव अण्णाजी दत्तो होते. या पदाचा सुरनीस म्हणूनही काही ठिकाणी उल्लेख आहे. त्यांनी शिवाजी महाराजांच्या प्रशासनात मुख्य सचिव म्हणून काम केले आणि मराठा साम्राज्याच्या प्रशासकीय कामकाजाच्या व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. रेकॉर्ड, पत्रव्यवहार आणि अधिकृत कागदपत्रे राखण्यासाठी सचिव जबाबदार होते. त्यांनी मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून काम केले, साम्राज्याच्या नोकरशाहीच्या कामकाजावर देखरेख ठेवली.

4. मंत्री: पहिले मंत्री दत्ताजीपंत यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणून काम केले आणि इतर राज्यांशी राजनैतिक संबंधांसाठी ते जबाबदार होते. त्यांनी साम्राज्याच्या वतीने करार, युती आणि व्यापार करारांची वाटाघाटी केली. मराठा साम्राज्याचा प्रभाव वाढवण्यात आणि बाह्य संबंध राखण्यात मंत्री यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

5. सेनापती: छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाचे पहिले सेनापती हंबीरराव मोहिते होते. लष्कराची संघटना, प्रशिक्षण आणि धोरणात्मक



Scanned with CamScanner

a

नियोजनाची जबाबदारी त्यांच्यावर होती. सेनापतींनी संरक्षण, युद्ध आणि साम्राज्याची सुरक्षा सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. हंबीरराव मोहिते यांनी शिवाजी महाराजांसोबत अनेक लष्करी मोहिमा आणि लढायांमध्ये भाग घेतला. त्यांनी अपवादात्मक नेतृत्व कौशल्य आणि शौर्य दाखवून मराठा सैन्याला त्यांच्या विरोधकांवर अनेक विजय मिळवून दिले. त्यांच्या नेतृत्वाने आणि शौर्याने या प्रदेशात मराठ्यांना एक मजबूत शक्ती म्हणून स्थापित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली

6. वाकनीस: पंडितराव म्हणून ओळखले जाणारे वाकनीस हे राजाचे धार्मिक सल्लागार होते. त्यांनी धार्मिक आणि अध्यात्मिक बाबींवर मार्गदर्शन केले, धार्मिक विधी केले आणि साम्राज्यात हिंदू विधींचे पालन सुनिश्चित केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात सेवा करणारे पहिले पंडितराव बद्दल मर्यादित माहिती उपलब्ध आहे, परंतु असे मानले जाते की त्यांचे पूर्ण नाव पंडितराव विश्वनाथ कुलकर्णी होते. त्यांनी धार्मिक आणि नैतिक बाबींसाठी कौन्सिलर म्हणून काम केले आणि हिंदू परंपरा आणि विधींशी संबंधित बाबींवर राजाला सल्ला देण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती.

7. न्यायधीश: निराजीपंत हे स्वराज्याचे पाहिले न्यायाधीश होते. त्यांनी न्याय व्यवस्थापित करण्याची आणि साम्राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी घेतली होती. त्यांनी कायदेशीर विवादांचे निराकरण केले आणि न्यायाचे निष्पक्ष वितरण सुनिश्चित केले.



Scanned with CamScanner

8. सुमंत: सुमंत, ज्यांना सचिव म्हणूनही ओळखले जाते, त्यांनी रेकॉर्ड आणि इंटेलिजन्स मंत्री म्हणून काम केले. त्र्यंबकपंत हे पहिले सुमंत होते . माहिती गोळा करणे आणि त्याचे विश्लेषण करणे, गुप्तचर नेटवर्क राखणे आणि राजाला सुरक्षा आणि प्रशासनाच्या बाबतीत महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी आणि सल्ला देणे यासाठी ते जबाबदार होते.

अष्ट प्रधानांनी कारभार कसा करावा यासाठी महाराजांनी कानुजाबता म्हणजेच आजच्या भाषेत कोड ऑफ कंडक्ट (नियमावली) तयार केला. अष्टप्रधान मंडळातील ८ पैकी ६ मंत्र्यांना वेळ पडल्यास महाराजांची युद्ध करण्याची आज्ञा होती. हि अष्ट प्रधान मंडळ पद्धती शाहू महाराजांच्या अखेरपर्यंत अस्तित्वात होती. अष्टप्रधान मंडळाने, राज्यकारभाराच्या विविध पैलूंमध्ये तज्ञ असलेल्या सदस्यांसह, छत्रपती शिवाजी महाराजांना कार्यक्षम प्रशासन आणि मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये मदत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या मंत्र्यांच्या सामूहिक शहाणपणाने आणि कौशल्याने साम्राज्याच्या कारभाराचा भक्कम पाया प्रस्थापित केला आणि त्याच्या एकूण यशात योगदान दिले.



Scanned with CamScanner

a

# प्रकरण ७ वे

# किल्ले रायगडची माहिती

शिवछत्रपती व किल्ले रायगड हे दोन्ही महाराष्ट्रासह देशाचेही मानबिंदू आहेत. सह्याद्रीच्या पर्वतरांगेत अत्यंत दुर्गम परंतु अतिशय सोयीच्या ठिकाणी रायगड आहे. सागरीकिनाऱ्यावर देखरेखीसाठी व व्यापारासाठी, तसेच देशावर व दक्षिणेकडे जाण्यासाठी रायगड अत्यंत सोयीचा किल्ला होता. इंग्रज कंपनीचा व्यापारी टॉमस निकल्सने २३ मे १६७३ रोजी भेट दिलेल्या रायगडचे वर्णन असे केले आहे - "डोंगराला तटबंदी बांधून हा किल्ला इतका अभेद्य केला आहे की भरपूर अन्नधान्य पुरवठा असेल तर अल्प शिबंदीच्या सहाय्यानेसुद्धा हा किल्ला संपूर्ण जगाविरुद्ध लढू शकेल. "[10] गडावर विपुल पठार. अठरा कारखाने बांधायला तिथे पुरेशी जागा. गडाचा बालेकिल्ला स्वत:च्या वास्तव्यासाठी आणि राजसभा इत्यादि वैभवशाली इमारती उभ्या करण्यासाठी अगदी पुरेसा. तेव्हां आबाजी सोनदेवाच्या हाताखाली हिरोजी इंदलकर हे वास्तुतज्ञ देऊन छत्रपतींनी तेथील वैभवशाली इमारतींचा पाया घातला. जवळ जवळ तीनशें शिल्पे त्यांनी गडावर निर्माण केली. त्यांत राणीवसा होता, राजवाडा होता, फड सदरा होत्या, धान्याची भांडारें होतीं, दारूची कोठारें होतीं, विवेकसभा आणि न्यायसभा होत्या, भली मोठी बाजारपेठ होती, घोडशाळा आणि हत्तीशाळा होत्या, शिबंदी रहायचीं घरें होतीं. कुशावर्त गंगासागरासारखीं तीर्थे होती.



Scanned with CamScanner

a

जगदीश्वर, शिर्काईसारखी देवळें होतीं. तळघरे आणि भुयारें होतीं, जयस्तंभ होते. टांकसाळ होती. गंगासागराच्या दक्षिण अंगाने बालेकिल्ल्यावर महाराजांचा भव्य राजवाडा व त्याला लागून राणीवसे उभारलेले होते. समोर द्वादशकोनी, नक्षीदार, पाच मजली दोन उत्तुंग मनोरे बांधण्यात आले. बालेकिल्ल्याच्या मध्यभागी सिंहासनाची जागा निवडलेली होती. या ठिकाणी ११८ फूट लांब, ३५ ॥ फूट रूंद व ४ ॥ फूट उंचीचा सिंहासनाखालील चौथरा बांधण्यात आला. त्यावरील प्रत्यक्ष सिंहासनाचा चौथरा १३ ॥ फूट लांब, ११ ॥ फूट रूंद व २ ॥ फूट उंच होता. सिंहासनाच्या बाजूने ५ ॥ फूट रुंदीचा प्रशस्त मार्ग असून महाराजांच्या रक्षणाची उत्कृष्ट व्यवस्था या भागात केलेली होती.

सिंहासनाचे स्थान पूर्वाभिमुख असून सिंहासनावरून सरळ रेषेत तोरणा व राजगडचे विलोभनीय दर्शन घडे. हिंदवी स्वराज्याची सुरुवात ज्यांच्या साक्षीने झाली त्यापैकी असलेल्या तोरणा राजगड यांच्या कुशीतून उगविणाऱ्या सूर्याची प्रथम किरणे सिंहासनाला स्पर्श करतील अशा पद्धतीने सिंहासनाची जागा निवडलेली होती! सिंहासनाच्या मागील बाजूनेच महाराजांना राजसभेत येण्यासाठी मार्ग होता. सिंहासनासमोर सुमारे २०० फुटांवर असलेला नगारखाना आहे. राजसभेचे हे प्रवेशद्वार. या कमानी द्वाराची उंची १९ फूट तर रूंदी ९ । फूट होती. दोन्ही बाजूंना प्रशस्त देवड्या असलेल्या या द्वारातून अंबारीसह व झेंड्यासह हत्ती आत येऊ शके. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना विलोभनीय दगडी कमळे कोरलेली होती. त्यांच्याच बाजूला उन्मत्त गजराजांचे



Scanned with CamScanner

a

निर्दालन करीत असलेल्या सिंहाकृती कोरलेल्या होत्या. द्वाराच्या डाव्या बाजूच्या देवडीतून वर जाण्यास जिना असून वर नगारखान्याची जागा होती. येथूनच चौघडा, नगारा, दुंदुभी, शिंगे, कर्णे वगैरे वाद्ये राज्याभिषेकप्रसंगी वाजणार होती. राजसभा सुमारे ६००० माणसे बसू शकतील एवढी प्रशस्त होती. या मोकळ्या राजसभेचे करामती बांधकाम म्हणजे सिंहासनाजवळ नेहमीच्या आवाजात बोलले तरी २०० फुटांवरील नगारखान्याजवळ ते जसेच्या तसे स्पष्ट ऐकू येई । बालेकिल्ल्याच्या उत्तर भागात राजधानीला शोभेल अशी प्रशस्त बाजारपेठ बांधलेली होती. समोरासमोर एका ओळीत २२-२२ दुकाने, दोन्ही रांगांमधील प्रशस्त राजमार्ग ४० फुटांचा. प्रत्येक दुकानाचा ओटा ५ फूट उंच, पालखी किंवा घोड्यावर बसूनसुद्धा खरेदी करता यावी इतका प्रशस्त. [7]सन १६५६ ते १६७४ अशीं तहत अठरा वीस वर्षे गडाच्या पुनर्निर्माणाचें हें कार्य चाललें होतें. ६ जून १६७४ या दिवशीं शिवछत्रपतींनीं स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला आणि अशा रीतीनें रायगडच्या पुनरुद्धाराच्या शेवटील पर्वाची वैभवशाली समाप्ति झाली.

"दुर्गशास्त्र" या विषयात पी. एच. डी. प्राप्त केलेले पुण्यामधील प्राध्यापक डॉ. मिलिंद पराडकर यांच्या संशोधनानुसार रायगडावरील सिहांसनाच्या चौथऱ्यासमोर पूर्व बाजूकडे असलेल्या नगारखान्याच्या कमानीची उंची १९ फूट आहे. सूर्याची किरणे सिहांसनाच्या चौथऱ्यावर यावीत असा या रचनेचा उद्देश आहे. उत्तरायण व दक्षिणायन अशा सूर्याच्या मार्गामुळे पूर्व क्षितिजावर एका ठराविक ठिकाणी सूर्य उगवणे हि एक रोजची घटना



Scanned with CamScanner

a

आहे,मात्र त्याच ठिकाणी पुन्हा सूर्य उगवणे हि सहा महिन्यातून एकदाच घडणारी घटना आहे. सिहांसनाची जागा व नगारखान्याची कमान यांना सांधणारी रेषा ही पूर्व पश्चिम रेषेशी उत्तरेच्या दिशेने २० अंशांचा कोन करते. रायगडाचे भौगोलिक स्थान १८ अंश व १४ मिनिटे उत्तर आहे. या भौगोलिक स्थानासाठी सूर्यभ्रमण नकाशा (सोलर पाथ डायग्रॅम) काढला असता असे लक्षात येते की सूर्य पूर्वेपासून उत्तरेकडे २० अंशांच्या कोनात फक्त ६ जूनच्याच दिवशी येतो व त्या दिवशी सूर्याची किरणे नगारखान्याच्या कमानीतुन थेट सिहांसनाच्या चौथऱ्यावरच पोहचतात[4]. राज्याभिषेकाचा मुहूर्तही ६ जूनच होता. . ! म्हणजेच नगारखान्याची रचना ही राजसभेचा व राज्याभिषेकाचा हेतू मनी धरूनच स्थापत्यशास्त्री, बांधकाम सुभ्याचे प्रमुख हिरोजी इंदुलकरांनी केलेली आहे हे नक्की.

राज्याभिषेकसमयी रायगडावरील रत्नशाळेंत आणि भांडारांत नानाप्रकारची संपत्ति एकत्र झालेली होती. कोठारें तुडुंब भरून वहात होतीं. मसाल्यांचा सुगंध चहुंदिशांस दरवळत होता. धान्याच्या कोठारांमधून सतरा हजार खंडी भात होतें. सत्तर हजार खंडी तेल होतें. दोनशें सत्तर खंडी सैंधव, दोनशें खंडी जिरें, दोनशें खंडी गोपीचंदन, दोन खंडी गंधक, पांढऱ्या कापडाची चार हजार ठाणें, हलक्या किमतीच्या कापडाचे तीन हजार तागे, बऱ्हाणपुरी उंची कापड एक हजार ठाणें, पैठणी कापडांचे चार हजार तागे, अहमदाबाद-जालना पेठांचे असंख्य तागे, डाळी, तंबाखू, साखर यांचे अगणित साठे!



Scanned with CamScanner

a

नऊ कोट रुपयांची सोन्याची नाणी, एकावन्न हजार तोळे सोनें, दोनशें तोळे माणके, एक हजार तोळे मोत्यें, पांचशें तोळे हिरे, तीस हजार तलवारी, चाळीस हजार भाले, पन्नास हजार दुधारी तलवारी, साठ हजार ढाली, चाळीस हजार धनुष्ये, अठरा लक्ष बाण, इत्यादि अगणित संपत्ति रायगडावर एकत्र झालेली होती! [6]. या यादीवरून श्री शिवछत्रपतींच्या साक्षेपी आणि संग्रही वृत्तीची कल्पना यावी. .





Scanned with CamScanner

a

# प्रकरण ८ वे

# राज्याभिषेक शक म्हणजे नवीन कालगणना किंवा कालमापन पद्धती.

तत्कालीन साऱ्या समाजाची आर्थिक घडी नीट बसावी म्हंणून राजांनी राज्याभिषेक शक सुरु केला. त्यावेळी वापरात असलेल्या सर्व कालमापन पद्धती यावनी म्हणजेच मुस्लिम होत्या. परंतु या पद्धती केवळ मुस्लिम होत्या म्हणून नवीन शक सुरु केला असे नसून त्यापाठीमागे एक ठोस व व्यवहारी कारण होते. उदा. हिजरी, शुहूर, अरबी, फसली इत्यादी. या सर्व कालमापन पद्धती इस्लामी रितीरिवाजानुसार चांद्र कलावरती अवलंबून होत्या. त्यामुळे प्रत्येक वर्षांमध्ये १० ते १२ दिवसांचा फरक पडत होता. कोणत्याही राजवटींची मुख्य संपत्ती व मिळणार कर म्हणजेच महसूल हा मुख्यत्वे धान्य रूपानेच मिळत होता. सर्व पिके पावसावरच अवलंबून असत व सर्व ऋतू हे सूर्याच्या भ्रमणावरती अवलंबून असतात. म्हणजेच सर्व पिके हि प्रत्यक्षात सौरवर्षांशीच निगडीत असतात. परंतु तत्कालीन चांद्रवर्षावर अवलंबून ठरवलेला महसुलाचा काळ पिके तयार होण्याच्या मानाने अधिकच अगोदर येत असे. त्यामुळे नवीन शक सौरवर्षावरती सुरु करणे गरजेचे होते. मृग हे पावसाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे नक्षत्र. शेतकऱ्याच्या द्रुष्टीने हीच वेळ नववर्षाची असते. म्हणूनच शेतकरी वर्गाचे मृगसाल (म्हणजेच नवीन वर्षाची सुरवात) प्रमाणित धरून त्या



Scanned with CamScanner

समयास राज्याभिषेक शक सुरु केला. सर्वात महत्वाचे म्हणजे युधिष्ठिर, शालिवाहन, विक्रमशक याप्रमाणे नव्या शकाला महाराजांनी स्वतःचे नाव दिले नाही. शिवराज्याभिषेक हा हिंदू अस्मितेची पुन: प्रतिष्ठापना करणारा मंगल क्षण असल्यामुळे त्याची स्मृती सदैव राहावी यासाठी या शकाला महाराजांनी राज्याभिषेक शक असेच नाव दिले[7]. परंतु राज्याभिषेकशक आता शिवशक म्हणूनच ओळखला जातो. राज्याभिषेकशक महाराष्ट्रात जवळजवळ १०७ वर्षे सुरु होता. [5]




ULTiMATE-SPOT.com



Scanned with CamScanner

a

# प्रकरण ९ वे

# राजव्यवहारकोश

मराठी भाषा वाचविण्याचे व मराठीला नवसंजीवनी देण्याचे सगळयात मोठे कार्य जर कोणी केले असेल तर ते शिवाजी महाराजांनी. मराठी भाषेवरसुद्धा फारशी भाषेचे अतिक्रमण झाले होते. अल्लाउद्दिन खिलजीच्या आक्रमणापासून राज्यकारभारात आणि दैनंदिन व्यवहारात आलेल्या अनेक फार्सी, अरबी, तुर्की शब्दांना पर्यायी संस्कृत अथवा प्राकृत शब्द योजण्याची कल्पना शिवाजी महाराजांना सुचली आणि त्यातूनच राज्याभिषेकानंतर (१६७४) त्यांनी 'राजव्यवहार कोश ' तयार करण्यासाठी रघुनाथ नारायण हणमंते या पंडिताची नियुक्ती केली. महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्याभिषेकाच्या खूपच अगोदर कितीतरी गडकिल्ल्यांची नावे बदलली. शिवाजी महाराजांच्या ३५० गडकिल्ल्यांच्या नावामध्ये एकही नाव फारसी अथवा इतर भाषेतील नाही. म्हणजे राजव्यवहारकोश लिहिण्याची प्रेरणा राज्याभिषेकाच्या ही अगोदर कितीतरी वर्षे महाराजांच्या मनात साकारत असली पाहिजे.

रघुनाथ पंडित यांनी रचलेल्या राजकोशाचे महत्व व रचना केवळ यावनी/फारशी शब्दांना प्रतिशब्द देण्यापुरतेच मर्यादित नव्हते तर त्यांच्या काही श्लोकांवरून शिवकालीन परिस्थितीचेही आकलन होते व काही घटना समोर



Scanned with CamScanner

येतात. राजकोशांमध्ये जवळपास १३८० शब्द आहेत. हे सर्व शब्द मराठी व संस्कृत मध्ये आहेत. रघुनाथपंत हनुमंते यांनी धुंडिराज व्यास नावाच्या विद्वान सहकाऱ्याला बरोबर घेऊन राजव्यवहारकोशाचे काम पूर्ण केले[2]. राजव्यवहारकोश मराठी भाषेला नवं संजीवनी देण्यासाठी महाराजांनी सुरु केला.

“मशहुरुल अनाम अजरत्र्याखाने" कोणत्याही पत्राचा वा फर्मानाचा हा फारशी मायणा बदलून "अखंडित लक्ष्मी अलंकृत, सकळ गुणालंकरण, राजश्रीया विराजीत, राजकार्यधुरंदर" अशी अस्सल मराठी विशेषणे वापरण्यास सुरवात केली. संज्ञा बदलल्याकी संवेदना बदलतात. तसेच दैनंदिन राज्यकारभारातील पेशवे, सुरनीस, मुजुमदार, सरनौबत, डबीर अशा अनेक फारशी शब्दांना पर्यायी मराठी शब्द पंतप्रधान, पंतसचिव, पंतअमात्य, सरसेनापती, पंतसुमंत असे देण्यात आले.



Scanned with CamScanner

a

# प्रकरण १० वे

## समारोप

कवी परमानंद यांनी शिवभारत ग्रंथ लिहिला. यात त्यांनी शिवाजी महाराजांना 'सनय' विशेषण वापरले आहे. 'सनय' शब्दाचे मराठीत होणारे अर्थ पुढीलप्रमाणे आहेत मार्गदर्शक, नेतृत्व, व्यवस्थापन, वर्तनशैली, जीवनशैली, द्रष्टेपणा, राजकीय शहाणपणा, राजनीतीतज्ञता, मुलकी प्रशासन, राज्यधोरण, नैतिकता, सत्य आणि न्यायावरील निष्ठा, सर्वांशी न्यायपूर्ण वागणूक, योजनाबध्दता, नियोजन व भावी धोरणांचा आराखडा,कामकाजाची पद्धत इ. एखादा व्यक्ती 'सनय' आहे याचाअर्थ त्याच्या व्यक्तिमत्वात हे सर्व गुण आहेत. शिवभारत ग्रंथ शिवकालीन आहे हे विशेष.

शिवाजी महाराजांचे खरे मोठेपण त्यांचे उत्तुंग चारित्र्य, सहिष्ण वृत्ती, व्यावहारिक बुद्धी, विशाल राजकीय दृष्टी, संघटन चातुर्य यात सामावले आहे. विखुरलेल्या मराठ्यांना (जे महाराष्ट्रात राहतात ते सर्व मराठे - प्रदेशवाचक, जातीवाचक न्हवे) एकत्र आणून त्यांचे एका राष्ट्रात रूपांतर घडवून आणले ही महाराजांची चिरस्थायी कामगिरी आहे. लोकांमध्ये जी स्वातंत्र्याची चिरस्थायी संजीवनी निर्माण केली. हाच महाराजांचा उत्तुंग वारसा आपल्या सर्वांना जपायचा आहे व वृद्धिंगत करायचा आहे. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे वैशिष्ट्य म्हणजे ज्यातील सारे वातावरण न्याय, नीती आणि



Scanned with CamScanner

सहिष्णुता यांनी भरलेले होते. खऱ्या अर्थाने ते लोक कल्याणकारी व उदारमतवादी राज्य होते.

सर्वात मोठे कार्य हे आहे की, त्यांनी एतद्देशीय स्वतंत्र्य राज्याचा पाया घातला. त्यांनी लोकांची राष्ट्रीय वृत्ती जागृत केली. खऱ्या अर्थाने हे राज्य राष्ट्रीय होते त्यामुळेच महाराजांच्या, शंभूराजांच्या, राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतरहि हे राज्य टिकले व फक्त टिकले नाही तर वाढतच गेले.

सर जदुनाथ सरकार यांच्या मते महाराष्ट्रीय माणसामध्ये स्वावलंबन, धाडस, चिकाटी, कमालीचा साधेपणा, सामाजिक समतेची भावना आणि माणसाला माणूस म्हणून जी प्रतिष्ठा असते त्या स्वाभिमानाची जिवंत जाणीव इत्यादी गुणांचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला होता व याच गुणांचा उपयोग छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारणीच्या कार्यात करून घेतला.

सर्व इस्लामी राज्यकर्त्यांनी शासनयंत्रणा धर्माला अनुसरून बनविली होती. मुस्लिम शासकांनी धर्माला शासनाच्या वा राज्यकारभाराच्या वरचे स्थान दिलेले. महाराजांचे युगपुरूषत्व यात आहे की त्यांनी धर्म,जात या सर्वांवर मात केली. राज्यकारभारात धर्माची किंवा धर्मकारण्यांची ढवळाढवळ अजिबात होऊ दिली नाही. राज्य उभे करण्यासाठी थोडीफार धर्माची मदत घेतली परंतु राज्य उभे राहिल्यानंतर त्यांनी ते धर्माच्या आधारावर चालविले नाही. शासन यंत्रणा धर्माला अनुसरून बनविली नाही. महाराजांचा हा दृष्टीकोन आजही तितकाच आदर्श आहे. साडेतीनशे वर्षांपूर्वी एक राजा या गोष्टी करतो हे आजही कल्पनेच्या पलीकडील वाटते. युगपुरुषत्वाची दुसरी खूण म्हणजे नेत्याने जनतेत



Scanned with CamScanner

a

निर्माण केलेली जिद्द व आत्मविश्वास. पृथ्वीराज चौहान,राणा संग,विजयनगरचे व देवगिरीचे साम्राज्य पराभवानंतर परत उभी राहू शकली नाहीत. परंतु महाराजांच्या निर्वाणानंतरही संपूर्ण प्रजा २७ वर्षे लढत होती. महाराजांनी त्यांना लढण्याचा आत्मविश्वास दिलेला. त्यामुळेच स्वयंस्फूर्थीने सारी जनता बादशाह औरंगजेबाविरुद्ध लढत होती.

महाराजांचे सर्वात मोठे यश म्हणजे मराठी लोकात निर्माण केलेला दुर्दम्य आत्मविश्वास व विजिगिषु वृत्ती. यामुळेच राजांच्या निर्वाणानंतरही संपूर्ण रयत लढत राहिली. न्यायाचं राज्य म्हणजे काय, प्रजेचं हित, दूरदृष्टी इ. अनेक गोष्टींचे मापदंड म्हणजे वंदनीय शिवराय होत. शिवशाही केवळ विस्तारवादी राजेशाही न्हवती. शिवशाहीला विचारांचे व योग्य ध्येयाचे अधिष्ठान तर होतेच होते, संस्कृतीचीही बैठक होती.

आजचा तरुण पुरेशा प्रगल्भपणे शिवाजी महाराजच्या राजकारणाचा व रयतेप्रति दायित्वाचा विचार करतोय का? हा खरा प्रश्न आहे. नाण्याच्या दोन बाजूप्रमाणे या प्रश्नाच्या उत्तराच्याही दोन बाजू आहेत. महाराजांना देव मानणारी युवा पिढी त्यांचे अनमोल विचार आपल्यात सामावून घेत नाही याचीच खंत वाटते. शिवराय फक्त उत्सवासाठीचे एक प्रतीक म्हणूनच राहिलेत काय? असा प्रश्न पडतो. शिवाजीमहाराज हा विषय सध्यातरी फक्त भावनेचा, अस्मीतेचा व राजकारणाचाच विषय आहे. अभ्यासाचा तसा जरा कमीच आहे.

सतराव्या शतकांतील उज्ज्वल, स्वाभिमानी इतिहासाची पुनरावृत्ति घडवून आणण्यासाठी आपण अहोरात्र मंत्र जपला पाहिजे ,



Scanned with CamScanner

a


'शिवरायाचे आठवावे रूप, शिवरायाचा आठवावा साक्षेप, शिवरायाचा आठवावा प्रताप भूमंडळी॥'

संकलक, लेखक - प्रा. श्री. अमोल शिवाजीराव सूर्यवंशी.

प्राध्यापक - भारती विद्यापीठाचे जवाहरलाल नेहरू तंत्रनिकेतन,कात्रज, पुणे

Email: amolss. 01@gmail. com

Mob: 9850038077



Scanned with CamScanner

a

# प्रकरण ११ वे

## संदर्भ:–

[1] श्री. शिवछत्रपतींचे क्रांतिकार्य - श्री. पु. ग. सहस्रबुद्धे.

[2] राजा शिवछत्रपती - श्री. बाबासाहेब पुरंदरे.

[3] शोध महामानवाचा - डॉ. श्रीनिवास सामंत.

[4] डॉ. मिलिंद पराडकर यांचा लेख

[5] क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र - श्री. कृष्णराव अर्जुन केळुसकर

[6] शिवतीर्थ रायगड - श्री. गो. नी. दांडेकर.

[7] शककर्ते शिवराय - श्री. विजय देशमुख.

[8] छत्रपती शिवाजी महाराज - श्री. वा. सी. बेंद्रे.

[9] शिवाजी कोण होता? - श्री. गोविंद पानसरे

[10] रायगडची जीवनकथा - श्री. शांताराम विष्णू आवसाळकर



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner